# Criterion-1

# Curricular Aspects

# Key Indicator- 1.3.

**Metric No 1.3.2** Percentage of students undertaking project work/field work/ internships

## Field Visit & Survey

| Sr. No. | Department | Name of Field Project | Number of Participant |
|---|---|---|---|
| 01 | Sociology | Study of the problems faced by project affected families under Gosekhurd Project | 40 |
| 02 | History | Study of the disposition of Historical Stupas in Pauni Area | 10 |
| 03 | Economics | A study of economic and social problems of laborers working in chilli plants in pauni | 30 |

**Dr. L. D. Balkhande College of Arts & Commerce**

**Pauni Dist.- Bhandara**

**Department of Sociology**

**Session – 2021-22**

**Subject :- Study of the problems faced by project affected families under Gose khurd Project**

# Survey Report

Dr. L.D. Balkhande college of Arts and Commerce, Pauni, Dist-Bhandara, under the Department of sociology, B.A. part Third students prepared a survey report (Field work project) by studying social and economical problems faced by the project affected families under the Gose khurd project of the village Korambhi in the Pauni taluka on 12|02| 2022. Forty students of B.A. final years participated in the survey and were divided into four groups. They have prepared a survey report about the social, economical, family, educational and health related problems of the villagers as well as the facilities and benefits received by the government, through an interview schedule. While preparing present survey report, students collected facts through simple random sample selection method, coded through classification, analyzed and explained through tables, and master chart. Verified the previously presented hypothesis and showed conclusions, recommendations and suggestions.

Through this, it was observed that most of the villagers have been displaced elsewhere, that's why they are estranged form relatives. The earlier socio-cultural, economics, family life of villagers have been disturbed, some people are homeless and unemployed.

Majority of the dam affected formers haven't received benefit facilities or concession provided by the government. No social level schemes are implemented at the village level. Adjusting to a new place is difficult. Serious problems of agriculture, employment, food, cattle among the villagers has been created. It is seen that a large number of social, cultural, economic, educational, mental health problems have arisen the displaced villagers.

Coordinator
Internal Quality Assurance Cell (IQAC,
Dr. L.D. Balkhande College of Arts and
Commerce, Pauni, Dist.- Bhandara

# — सर्वेक्षण अहवाल —

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर

डॉ. एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स,

पवनी, जि. भंडारा

समाजशास्त्र विभाग

सत्र २०२१—२०२२

बी.ए. भाग—३ (तृतीय सत्र)

## ''गोसेखुर्द प्रकल्प अंतर्गत प्रकल्पग्रस्त कुटुंबांना निर्माण होणाऱ्या समस्यांचे अध्ययन''

— विशेष संदर्भ —

पवनी तालुक्यातील कोरंभी गाव

(सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण)

— सादरकर्ता —

समाजशास्त्र विभाग

बी.ए. भाग—३

तृतीय सत्राचे विद्यार्थी

— मार्गदर्शक —

समाजशास्त्र विभाग

प्रा. डॉ. अनिता आ. सार्वे

# सर्वेक्षण अहवाल

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर**

**डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स,**

**पवनी, जि. भंडारा**

**समाजशास्त्र विभाग**

**सत्र २०२१ — २०२२**

**बी.ए. भाग—३ (तृतीय सत्र)**

**''गोसेखुर्द प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्त कुटुंबांना निर्माण होणाऱ्या समस्यांचे अध्ययन''**

**— विशेष संदर्भ — पवनी तालुक्यातील कोरंभी गाव**

**( सामाजिक, आर्थिक, सर्वेक्षण अहवाल)**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर, विद्यापीठ नागपूर अंतर्गत डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स, पवनी, जि. भंडारा.

समजाशास्त्र विभागांतर्गत बी.ए. तृतीय सत्राच्या विद्यार्थ्यांनी गासेखुर्द प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्त कुटूबांना निर्माण होणाऱ्या समस्यांच्या अध्ययनाकरीता पवनी तालुक्यातील कोरंभी या गावाचे सामाजिक, आर्थिक समस्येचे अध्ययन करून सर्वेक्षण अहवाल (Field work project) तयार केले. हे सर्वेक्षण दि. १२/०२/२०२२ रोजी शनिवारला करण्यात आले. या सर्वेक्षणाकरिता बी.ए. भाग तृतीय सत्राच्या ४० विद्यार्थ्यांचा सहभाग लाभलेला असून विद्यार्थ्यांचे प्रत्येकी चार गटांमध्ये विभागणी करण्यात आले. प्रस्तुत सर्वेक्षणाद्वारे विद्यार्थ्यांनी प्रकल्पग्रस्त कोरंभी गावातील ग्रामस्थांचे सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, शैक्षणिक, आरोग्याविषयक समस्येबद्दल तसेच शासनातर्फे मिळालेल्या सोयी, सवलती, लाभ या बद्दल संपूर्ण माहीती मुलाखत अनुसूचिद्वारे घेवून सर्वेक्षण अहवाल सादर तयार केलेला आहे. प्रस्तुत सर्वेक्षण अहवाल तयार करतांना विद्यार्थ्यांनी साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीद्वारे तथ्य संकलित करून, वर्गीकरणाच्या माध्यमातून सांकेतीकरण करून मास्टर चार्टद्वारे सारण्यांच्या माध्यमांतून विश्लेपण व स्पष्टीकरण करून पूर्वी मांडण्यात आलेल्या गृहीत कृत्याचा पडताळा घेवून निष्कर्ष, शिफारशी, सुचना दर्शविण्यात आले.

या निष्कर्षाद्वारे लक्षात आले की,

१. बहुसंख्य ग्रामस्थांचे विस्थापन दुसरीकडे झाले आहे.

२. बहुसंख्य उत्तरदाते हे विस्थापनामुळे नातेवाईकांपासून दुरावले गेले आहे.

३. ग्रामस्थांचे पूर्वीचे सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक, कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त झाले आहे.

४. काही लोक बेघर व बेरोजगार झालेली आहेत.

५. बहुसंख्य धरणाग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या सोयी—सवलतींचा लाभ मिळाला नाही.

६. गावपातळीवर ग्रामपंचायत मार्फत समाजकल्याणच्या योजना राबविल्या जात नाही.

७. नवीन जागेवर समायोजन करणे कठीण झालेले आहेत.

८. ग्रामस्थांमध्ये शेतीची, रोजगारांची, अन्नधान्यांची, गुराढोरांची बिकट समस्या निर्माण झालेली आहे.

९. नवीन जागेवर राहण्यास आल्यानंतर विस्थापितांना नवीन सामाजिक जीवनाशी, पर्यावरणाशी समायोजन करावे लागत आहे.

१०. ग्रामस्थांमध्ये मोठया प्रमाणात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, मानसिक आरोग्याविषयक समस्या निर्माण झालेली दिसून येत आहे.

ग्रामस्थांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्यांविषयी व कौटुंबिक समस्यांच्या निरोकरणाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी काही उपाय योजना सूचविल्या.

**उपाययोजना :**

१. विस्थापित लोकांना घरासाठी मोफत जागा द्यावी.

२. प्रकल्पग्रस्त लोकांना उदरनिर्वाहासाठी शेतजमीन देण्यात यावे. बहुताश लोकांचा शेती व्यवसाय असल्यामुळे केवळ घरासाठीच जमीन नाही तर उपजीवीका चालविण्यासाठी शेतजमीनी देण्यात यावे.

३. भरपाई वेळेवर द्यावी — विस्थापीत लोकांची शेती प्रकल्पात जास्त असल्यामुळे त्यांच्या संपत्तीचे योग्य मूल्यांकन करून त्यांच्या संपत्तीची भरपाई वेळेवर द्यावी.

४. घरे बांधून द्यावी — विस्थापीत पुनर्वसन झालेल्या लोकांना घरासाठी जागा देऊनच भागणार नाही तर त्या जागेवर घरे बांधून घ्यावी.

५. नागरी सोयाी पुरविणे — विस्थापीत पुनर्वसन वसाहतीत सर्व प्रकारच्या उदा? पाण्यासाठी विहीर बांधणे, रस्ते तयार करणे, विद्युत, दवाखान प्राथमिक शाळा, समुदाय, खेळण्याचे मैदान मनोरंजनाची साधने इत्यादी पुरविणे आवश्यक आहे.

६. विस्थापित झालेल्या कुटुंबातील कमीत कमी एका सदस्यांस प्रकल्पामध्ये किंवा इतर ठिकाणी नौकरी देण्यात यावी.

७. शासनाने धरग्रस्तांच्या मुलांना उच्च शिक्षणाकरिता किमान अर्धा खरी तरी लागु करावा.

८. शासनाने धरणग्रस्तांच्या जास्तीत जास्त मागण्या मान्य करून त्या त्वरित पूर्ण कराव्यात.

९. शासनाने संपूर्ण गाव सोयीयुक्त करूनच त्यानंतरच धरणग्रस्तांना स्थलांतरित करावे.

१०. धरणामध्ये जाणाऱ्या शेती व घरांची जागा यांना योग्यतेनुसार भाव द्यावा.

अशाप्रकारे विविध उपया योजना, सूचना सूचविल्या गेल्या आणि त्यांनतर महाविद्यालयाद्वारे आयोजित प्रकल्पाग्रस्त पवनी तालुक्यातील कोरंभी या गावाच्या सर्वेक्षणाच्या आधारे ग्रामविकास अधिकारी व गावातील सरपंच यांना अहवाल देण्यात आलेले आहे. हा अहवाल तयार करण्यासाठी ४० विद्यार्थ्यांचा सहभाग लाभला.

**निष्पत्ती :—**

१) विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्यात वाढ झाली.

२) विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढला.

३) धरणग्रस्त ग्रामस्थांनच्या समस्येविषयी जाणिव झाली.

४) तथ्य मांडण्याचे कौशल्य विकसित झाले.

५) विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाचा संग्रह निर्माण झाला.

समाजशास्त्र विभाग
प्रा. डॉ. अनिता सार्वे
डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ
आर्टस ॲन्ड कॉमर्स, पवनी,
जि. भंडारा

## अध्ययन पद्धती :—

समाजशास्त्र हा अतिशय व्यापक विषय आहे. यामध्ये वैज्ञानिक व वस्तुनिष्ठ पद्धतीने एखादया घटनेचे अध्ययन करण्यात येते. समाजशास्त्रात संपूर्ण समाजाचे व्यवस्थितरित्या वर्णन आणि स्पष्टीकरण करण्यात येत असून प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे अभ्यास करण्यात येते.

एखादया घटनेचे अध्ययन हे जेव्हा निरीक्षण व प्रत्यक्ष मुलाखत पद्धतीने करण्यात येत असल्यामुळे कोणत्याही घटनांच्या समस्यांच्या अध्ययनाची उद्दिष्टे पूर्ण होण्यास काही अडथळे येत नसून त्या समस्येचे निराकरण, निष्कर्ष व त्यावर उपाययोजना तसेच शिफारशी करण्यास मदत मिळते. या अनुषंगानेच कोरंभी या गावाचे प्रत्यक्ष निरीक्षणाच्या माध्यमातून व ग्रामस्थाच्या मुलाखत अनुसूचीद्वारे प्रश्नावली भरून कोरंभी या गावाचे सर्वेक्षण करण्यात आले. याकरिता बी. ए. भाग तृतीय समाजशास्त्राच्या ४० विद्यार्थ्यांचे ०४ गटामध्ये विभाजन करून प्रत्यक्ष निरीक्षण व प्रश्नावलीच्या सहाय्याने माहिती जमा करून सर्वेक्षण अहवाल तयार करण्यात येईल. याकरिता पुढील गोष्टींचा आधार घेण्यात आला.

१. सर्वप्रथम ग्रामपंचायतीला भेट देवून, गावाची सीमा निश्चित करण्यात येईल.
२. कोरंभी या गावात किती घरे आहेत, यांची माहिती जाणून घेण्यात येईल.
३. कोरंभी या गावाचे पुनर्वसन विस्थापन झाले की नाही तसेच ग्रामस्थांच्या समस्या शासनाकडून मिळालेल्या सोई, लाभ, सवलती इ. याविषयी माहिती जाणून घेण्यात येईल.
४. ग्रामपंचायतीमार्फत गावातील संपूर्ण माहिती घेण्यात येईल.
५. सर्वेक्षण करणाऱ्या विद्यार्थ्यांने एका गटात १० विद्यार्थी याप्रमाणे गट तयार करण्यात आले.

वरील प्रक्रियेनंतर सर्व विद्यार्थ्यांनी गटागटाने कुटुंबप्रमुखांची प्रत्यक्ष भेट घेवून त्यांना सर्वेक्षणाचा उद्देश सर्वप्रथम समजावून सांगितला. गावातील ग्रामस्थांशी

सलोख्याची भावना निर्माण केली. त्यांच्या समस्येविषयी माहिती घेवून प्रश्नावली भरून घेतली.

प्रश्नावलीनुसार सारण्या तयार करण्यात आले व प्राप्त सारणीच्या आधारे अहवाल तयार करण्यात आले. यात समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. अनिता सार्वे मॅडम यांच्या योग्य मार्गदर्शनाखाली सहकार्य लाभले.

**विषयाची निवड :—**

प्रस्तुत विषय ''गोसेखुर्द प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्त कुटुंबांना निर्माण होणाऱ्या सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक समस्यांचे अध्ययन करण्याकरिता पवनी तालुक्यातील कोरंभी या गावाची निवड करण्यात आली.

**समस्यासुत्रण :—**

''गोसेखुर्द प्रकल्पाअंतर्गत प्रकल्पग्रस्त कुटुंबांना निर्माण होणाऱ्या समस्येंचे अध्ययन.'' (पवनी तालुक्यातील पुनर्वसीत कोरंभी गावाचे सर्वेक्षण अहवाल)

**विशेष संदर्भ :—**

पवनी तालुक्यातील कोरंभी गाव

**साहित्य परिक्षण :—**

प्रस्तुत सर्वेक्षणासाठी आम्ही समाजशास्त्र विभागाचे तृतीय सत्राचे विद्यार्थी असुन, गोसेखुर्द प्रकल्पअंतर्गत प्रकल्पग्रस्त कुटुंबांना निर्माण होणाऱ्या समस्यावर निर्माण होणारे प्रश्न जाणून घेतले. त्यानुसार मुलाखत अनुसूची तयार करून साहित्यांचे परिक्षण करण्यात आले.

**अध्ययनाचे (सर्वेक्षणाचे) उद्देश :—**

१. गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांच्या शैक्षणिक व कौटुंबिक बाबींचे अध्ययन करणे.
२. प्रकल्पग्रस्तांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
३. प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.
४. गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांना शासनाकडुन मिळालेल्या पायाभुत सोयी बाबतचे अध्ययन करणे.
५. गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त लोकांना येणाऱ्या समस्यांचे अध्ययन करणे.
६. पुनर्वसनाबाबत प्रकल्पग्रस्तांच्या मतांचे अध्ययन करणे.

**उपकल्पना / गृहीतकृत्ये :—**

संशोधनासाठी घेण्यात आलेल्या संशोधन समस्येची किंवा संशोधनातील प्रश्नांची संभाव्य उत्तरे म्हणजे गृहीतकृत्ये होय. जी संशोधनाच्या स्वरूपात पुर्वी मांडण्यात येतात व ज्यांचा पडताळा संशोधन झाल्यानंतर करण्यात येते. या अनुषंगाने सर्वेक्षणाकरिता काही गृहीतकृत्ये मांडण्यात आली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

१. गोसेखुर्द प्रकल्पामुळे लोकांचा समाजामध्ये सामाजिक दर्जा खालावलेला आहे.

२. गोसेखुर्द प्रकल्पामुळे लोकांचे स्थलांतरण झाल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती खालावलेली आहे.

३. गोसेखुर्द प्रकल्पामुळे लोकांचे व्यावसायिक किंवा रोजगाराभिमुख पुनर्वसन झालेले नाही.

४. गोसेखुर्द प्रकल्पामुळे ग्रामस्थांना मिळणाऱ्या सोयी, हक्क यांची त्यांना जाणीव नाही.

**अध्ययनाचे क्षेत्र :—**

बी. ए. भाग तृतीय सत्राच्या विद्यार्थ्यांकडून सर्वेक्षण अहवालांकरिता पवनी तालुका क्षेत्रावरील कोरंभी या गावाची निवड करण्यात आली.

**अध्ययनाचे विश्व :—**

विश्व किंवा समग्र हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. सर्वसाधारण आपण निवडलेलया अध्ययन क्षेत्रात आपलया सर्वेक्षणासाठी ज्या व्यक्ति किंवा घटक उपयुक्त आहेत अशा सर्वांना अध्ययन विश्व म्हणतात.

प्रस्तुत अध्ययनाकरिता पवनी तालुक्यातील कोरंभी या गावाचे अध्ययन विश्व आहे.

**नमुना निवड :—**

सामाजिक तथ्य गोळा करण्यासाठी त्या समाजाच्या अथवा समुहाच सर्व सदस्यांची किंवा एकमेकांशी संपर्क साधने व त्यांच्याकडून तथ्य संपादन करणे शक्य होत नाही. म्हणून ही पद्धत स्वीकारली जाते.

## गुडे आणि हॉट :—

''विशिष्ट समुहातील प्रतिनीधी निवडुन त्यांच्या कडून माहिती मिळवने व ती माहिती संपूर्ण समुहाशी निगडीत आहेत असे मानने या पद्धतीत नमुना निवड असे म्हणतात.

नमुना नावाप्रमाणे एक एक विस्तृत समुहाचा लघु प्रतिनिधी आहे.

## नमुना निवडीचे दोन प्रकार :—

१) संभाव्यता नमुना निवड पद्धती

२) गैर संभाव्यता नमुना निवड पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये संभाव्यता नमुना प्रकारातील साधा यादृश्चिक नमुना पद्धतीतील लॉटरी तंत्राची वापर करून तथ्य संकलीत करण्यात येईल.

वरीलपैकी विद्यार्थ्यांनी संभव्यता नमुना निवड पद्धतीमधील सांधा यादृच्छिक नमुना निवडी पद्धत उपयोगात आणली आहे. यात पक्षपात होण्याचा संभव नसतो. तसेच लॉटरी पद्धतीत संपूर्ण एककाचा नमुन्यातच निवडुन येण्याची समान संधी असते.

## संशोधन आराखडा :—

कोणतेही कार्य करण्यापूर्वी त्याचा निश्चित आराखडा तयार करावा लागले जेणेकरून कामात सुसूटितपणा व व्यवस्थितपणा येतो.

## १) संशोधन आराखडयाचे प्रकार :—

- अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा
- वर्णनात्मक
- प्रयोगात्मक
- निदानात्मक

वरील आराखडयाकरिता विद्यार्थ्यांकडून वर्णनात्मक आणि निदानात्मक आराखडयाचा उपयोग करण्यात येईल.

## तथ्य संकलन पद्धती :—

प्रस्तुत सर्वेक्षण अहवालामध्ये प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीचा म्हणजेच त्यात निरीक्षण, मुलाखत प्रश्नावली अनुसूचीचा वापर करण्यात येईल. तसेच दुय्यम पद्धती म्हणजेच प्रकाशित, अप्रकाशित, अहवाल, दैनंदिनी इ. समावेश केला असेल.

## तथ्य प्रक्रियाकरण :—

संकलीत केलेली माहीती अपरिपक्व असल्याने त्यांना परिपक्वता आणण्यासाठी तथ्यांचे विश्लेषण करून संशोधनाची योग्य मांडणी करण्याची प्रक्रिया म्हणजे तथ्य प्रक्रियन.

## तथ्य वर्गीकरण :—

तथ्य संकलन झाल्यानंतर सर्व मुलाखत अनुसूची एकत्रित असल्यात आल्यानंतर विखुरलेल्या तथ्यांच्या आधारे विश्लेषण शक्य होणार नाही म्हणून विस्कळीत तथ्य एकत्रित करून त्यांचे वर्ग पाडून क्रमवार लावण्यात येईल.

## संकेतीकरण :—

वर्गीकरण व माहीतीला व तथ्यांना योग्य संकेतन क्रमांक देण्यात येईल.

## मास्टर चार्ट :—

सर्वेक्षण अहवाल सादर करण्याकरिता मास्टर चार्ट अतिशय आवश्यक घटक आहे. विस्कळीत माहीतीला आकडेवारीच्या रूपाने एकत्रित करण्यासाठी उपयोग करण्यात आले व मास्टर चार्ट करून सारण्या तयार करण्यात येईल.

## सारणीकरण :—

मास्टरचार्ट वरून मिळालेल्या आकडेवारीच्या आधार प्रत्येक प्रश्नमार्ग एक याप्रमाणे सारख्या तयार करण्यात येईल व त्यावरून विश्लेषण व निष्कर्षण काढण्यात येईल.

## विश्लेषण व निर्वचन :—

सारणीमध्ये दिलेल्या माहीतीच्या आधारे प्रतिशत यांच्या आधारावर विश्लेषण व स्पष्टीकरण करून त्यावर निष्कर्ष काढण्यात येईल.

# विश्लेषण व निर्वचन

## उत्तरदात्यांची वैयक्तिक व कौटुंबिक माहिती

### सारणी क्र. १

### उत्तरदात्यांचे वय दर्शविणारी सारणी

उत्तरदात्यांच्या वयोमर्यादेमुळे त्यांच्यातील काम करण्याची परिपक्वता व निर्णय घेण्याची क्षमता इत्यादी बाबींची माहिती मिळते.

| अ. क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २२ ते २५ वर्ष | १५ | ३०.०० |
| २ | २६ ते ३० वर्ष | १३ | २६.०० |
| ३ | ३० ते ३५ वर्ष | १८ | ३६.०० |
| ४ | ३५ पेक्षा जास्त | ०३ | ०६.०० |
| | एकूण | ५० | १००.०० |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते कि, २२ ते २५ वयोगटातील एकुण १५ उत्तरदाते असुन त्यांचे शेकडा प्रमाण ३०.०० आहे. तर २६ ते ३० वर्ष वयोगटातील उत्तरदाते १३ असुन त्यांचे शेकडा प्रमाण २६.०० आहे. तर ३० ते ३५ वर्ष वयोगटातील उत्तरदात्यांचे प्रमाण १८ असुन त्यांचे शेकडा प्रमाण ३६.०० आहे. तर ३५ पेक्षा जास्त उत्तरदात्यांचे प्रमाण ०३ असुन त्यांचे शेकडा प्रमाण ०६.०० आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, ३० ते ३५ वर्ष वयोगट असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ही इतर वयोगट असणाऱ्या उत्तरदात्यांपेक्षा जास्त आहे.

### उत्तरदात्यांच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न दर्शविणारी सारणी

उत्तरदात्यांची आर्थिक स्थिती दर्शविण्यासाठी पुढील सारणी घेण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ३००० ते ५००० | ३० | ६०.०० |
| २ | ५००० ते ८००० | १५ | ३०.०० |
| ३ | ८००० च्या वर | ०५ | १०.०० |
| | एकूण | ५० | १००.०० |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते कि, एकूण ५० उत्तरदात्यापैकी ३००० ते ५००० उत्पन्न असणारे उत्तरदाते ३० असुन त्यांचा शेकडा प्रमाण ६०.०० आहे. तर ५००० ते ८००० उत्पन्न असणारे उत्तरदाते १५ असून त्यांचा शेकडा प्रमाण ३० आहे. तर ८००० च्या वर असणारे उत्तरदाते ०५ असून त्यांचा शेकडा प्रमाण १० आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, ३००० ते ५००० मासिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण जास्त असून ८००० उत्पन्न असणारे उत्तरदात्यांचे प्रमाण कमी आहे.

## ग्रामस्थांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचे अध्ययन

गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त सर्वेक्षण अध्ययल प्रकरणात वेगवेगळया वैयक्तिक व कौटुंबिक पार्श्वभूमीवर सारणीकरण केले. परंतु या पार्श्वभुमीवर प्रकल्पग्रस्त लोकांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीची पूर्ण कल्पना करता येत नाही. त्याकरिता पुढील सारण्यांद्वारे गोसेखुर्द प्रकल्पामुळे कोरंभी या गावातील ग्रामस्थांच्या सामाजिक आर्थिक स्थितीचे अध्ययन केले आहे.

प्रस्तुत सारण्यांद्वारे धरणग्रस्त लोकांच्या, परिस्थितीचा काही अंशी विचार करण्यात आलेला असुन, आजच्या वाढत्या युगामध्ये सामान्य जीवन जागणे कठीण झाले आहे. धरणग्रस्त लोकांकरिता शासनाने विशेष लाभ सवलती दिल्या अनेक कोटी रूपये खर्च केले, परंतु काही योजनाचां लाभ, सवलती धरणग्रस्त लोकांपर्यंत पोहचू शकले नाही.

उत्तरदात्यांच्या परिस्थितीची माहीती घेत असतांना विद्यार्थ्यांनी उत्तरदात्यांच्या वैयक्तिक जीवनावर गोसेखुर्द धरणाचा कसा परिणाम झाला, त्याची संपूर्ण शेती धरणात गेली काय, त्यांची इतर माहिती उत्तरदात्यांच्या कुटुंबातील आर्थिक सामाजिक परिस्थिती यांची माहीती आपल्याला ही पुढील सारण्यांवरून प्राप्त होणार.

## विभाग — अ

## ग्रामस्थांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचे अध्ययन

**निष्कर्ष :**

१) जास्तीत जास्त उत्तदात्यांचे वार्षिक उत्पन्न २०००० ते २५००० आहे.

२) जास्तीत जास्त उत्तरदाते शेती हा व्यवसाय करणारे आहेत.

३) जास्तीत जास्त उत्तरदात्यांची जमीन धरणात गेली आहे असे आढळुन आले.

४) बहुसंख्य उत्तरदात्यांची आर्थिक परिस्थिती खालावलेली आहे.

५) बहुसंख्य लोकांचे पुनर्वसन हे दुसरीकडे झालेले आहे.

६) बहुसंख्य उत्तरदाते हे विस्थापनामुळे नातेवाईकापासुन दुरावल्या गेलेले आहे.

७) गावपातळीवर सार्वजनिक कार्यक्रम हे कधी—कधीच घेतले जातात.

८) कोरंभी या गावात आरोग्य विषयक कार्यक्रम घेतले जात नाही.

९) कोरंभी या गावात रूढी, प्रथा, परंपरा हया मोठया प्रमाणात पाळल्या जातात.

१०) कोरंभी या गावात ग्रामपंचायत आहे.

## विभाग — क

## पुनर्वसनाबाबतची माहिती

**निष्कर्ष :**

१) जुन्या कोरंभी गावातील लोक एकाच ठिकाणी स्थायी आहे.

२) धरणग्रस्त गावातील लोकांच्या बहुसंख्य मागण्या पूर्ण झाल्या आहेत.

३) धरणग्रस्त ग्रामस्थांना पैशाची सहानुभूती जागेची या सर्व बाबींची मदत पाहिजे असते असे मत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण जास्त आहे.

४) बहुसंख्य लोक शासनाच्या मदतीबाबत समाधानी नाहीत.

५) बहुसंख्य लोकांचा धरण बांधण्यास विरोध आहे.

६) बहुसंख्य लोक विस्थापनाबाबत अंशतः समाधानी आहेत.

७) गावातील व्यसनाधिनतेचे प्रमाण फार मोठया प्रमाणात आहे.

८) संपूर्ण गावाच्या विकासाकरिता धरणे बांधण्याची संकल्पना योग्य आहे, असे मत धारण करणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या कमी प्रमाणात आहेत.

९) बहुसंख्य ग्रामस्थांच्या मते, शासनाने धरणग्रस्तांना सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असे मत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण जास्तीत जास्त आहे.

१०) बहुसंख्य लोकांच्या मते, धरणग्रस्तांचे जीवन अतिशय वाईट आहे.

## डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्स पवनी जि. भंडारा

### समाजशास्त्र विभाग

सत्र- 2021 -2022

बी. ए. भाग 3 (तृतीय सत्र)

### मुलाखत अनुसूची

" गोसेखुर्द प्रकल्प अंतर्गत प्रकल्पग्रस्त कुटुंबांना निर्माण होणाऱ्या समस्यांचे अध्ययन"

विशेष संदर्भ : पवनी तालुक्यातील कोरंभी हे गाव

(सामाजिक, आर्थिक, पुर्नवसना संबंधी , सर्वेक्षण प्रश्नावली )

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | विद्यार्थ्याची सही |
|---|---|---|
| 1 | मयुरी दिलीप जांभुळकर | M. D. Jambhulkar |
| 2 | प्रतिक्षा दादाजी खोब्रागडे | P. D. Khobragade |
| 3 | प्रिती अशोक मानापुरे | Priti manapure |
| 4 | लक्ष्मी आनंदराव काटेखाये | L. A. Katekhaye |
| 5 | पुजा बादल जुमडे | P. B. Jumde |
| 6 | तृप्ती विलास मोटघरे | T. V. Motghare |
| 7 | अर्पिता धनराज सुरकर | A. Surkar |
| 8 | शारदा मारोती नागपुरे | S. Nagpure |
| 9 | मेघा जयपाल बोरकर | M. J. Borkar |
| 10 | शिवानी धनराज पारधी | Pardhi |
| 11 | प्रतिक्षा गणपत माथुरकर | [illegible] |
| 12 | वैशाली अरुण भानारकर | [illegible] |

| | | |
|---|---|---|
| 13. | प्रमिला भगवान पचारे | P. Pracha |
| 14 | पल्लवी श्रीराम राउत | P. Raut |
| 15 | ओमेश्वरी केशव उमरेडकर | O.k. Umredkar |
| 16 | सविता खडु खाडाडे | S.k. Khadade |
| 17 | कोयल राजेश येवले | Koyale |
| 18 | कविता मनोहर बावनकर | K.m. Bawankar |
| 19 | विशाखा चंद्रभान बावनकर | V.C. Bawankar. |
| 20 | रिया राजेश खोब्रागडे | Riya khobragade |
| 21 | स्वेता मारोती मोहटे | Smohate. |
| 22 | मयुरी अरविंद पचाबुधे | MPchbualle |
| 23 | तेजस्विनी ईश्वर तिघरे | T. E. Tighare |
| 24 | अंकिता मनोज रंगारी | A. M. Rangari |
| 25 | विपिन मनोज मनिभावणे | Kbawne |
| 26 | हितेश दयाराम देशमुख | H. D. Deshmukh. |

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | 13 | अजय गोपिचंद ढाकाते | A.G. Dhakate |
| 28 | 14 | गौतम प्रकाश मेश्राम | G. P. meshram |
| 29 | 15 | पुनम लक्ष्मण मेश्राम | punam. |
| 30 | 16 | अस्मिता पुरुषोत्तम शेरकुरे | A. P. Sherkure |
| 31 | 17 | अमित अरविंद सुरकर | Amit |
| 32 | 18 | जयेश रामचंद्र कुंभेकर | Jeesh |
| 33 | 19 | मेघा जयपाल बोरकर | M. G Borkar |
| 34 | 20 | प्रतिक्षा गणपत माथुरकर | P mathurkar |
| 35 | 21 | नुतन हिरालाल घोडीचोर | N. Ghodichore |
| 36 | 22 | अनुराग पुरुषोत्तम सुतारे | A Sutare |
| 37 | 23 | किरण रंजीत लांजेवार | Lanjewar |
| 38 | 24 | प्रविण ज्ञानेश्वर देशमुख | |
| 39 | 25 | सौरभ दिलीप हटवार | S. Hatwar |
| 40 | 26 | सिमा कवडू शिरामे | Seema shirame |
| | 27 | | |
| | 28 | | |
| | 29 | | |
| | 30 | | |

::मार्गदर्शक::

डॉ.अनिता आसाराम सार्वे

डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस

अँड कॉमर्स पवनी जि. भंडारा

सर्वक्षण अहवाल (समाजशास्त्र ) विभाग दि.१२/०२/२०२२

गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त- पवनी ता. कोरंभी गाव (बि.ए.भाग ३ सत्र २०२१-२०२२



















# Dr. L. D. Balkhande College of Arts & Commerce

## Pauni Dist.- Bhandara

### Department of History & Ancient Indian History, Culture and Archaeology

### Session – 2021-22

### Subject :- Study of the disposition of Historical Stupas in Pauni Area

## Survey Report

Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University Nagpur, Dr. L D Balkhande College of arts and commerce Pauni, District Bhandara, under the department of history and ancient Indian history, culture and archaeology B.A .final year students prepared a survey report (filled work project) by studying the historical Stupas in the Pauni area. This survey was conducted on 5 May 2022. Through the survey the students have studied the stupas in pawani area and prepared the survey report by interviewing the problems related to the Stupas, facilities and concessions received by the government. While preparing, students collected the data through simple random sampling method, analysed and explained following recommendations and suggestions. Through this conclusion it was observed that due to the destruction of stupas in the area the historical importance of the city of Pawani in the past has been lost. The remote location of the stupas became difficulty for the citizens to understand the historical importance of Pauni. Because of the remotness of the stupas, the importance of the preserving our historical heritage is no longer there, non preservation of historical heritage tourism has suffered and unemployment problems increased as tourism got hit.

By solving the problems related to the stupas through the above conclusion the students suggested some remedial plans in this regard. The heritage of historical Stupas in Pawani should be preserved so that the future generation gets to know about our past history. Administration should pay attention to the disrepairs in Pauni area. Archaeology department should be given the management of this specially to solve the problems. By preserving the heritage appropriate tourism facility should be provided and it will increase in tourism and employment opportunities.

Coordinator
Internal Quality Assurance Cell (IQAC
Dr. L.D. Balkhande College of Arts and
Commerce, Pauni, Dist.- Bhandara

# -सर्वेक्षण अहवाल-

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर

डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स पवनी,

जिल्हा- भंडारा

इतिहास विभाग

सत्र - २०२१-२२

बी. ए. अंतीम वर्ष (सहावे सत्र)

# ''पवनी परिसरातील ऐतिहासीक स्तुपांच्या दुरावस्थेचे अध्ययन''

--सादरकर्ता--

इतिहास विभाग

बी. ए. अंतिम वर्ष

--मार्गदर्शक--

प्रा. मंगेश गोपीचंद वाहाणे

(सहाय्यक प्राध्यापक)

इतिहास विभाग प्रमुख

# सर्वेक्षण अहवाल

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
## डॉ. एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स पवनी,
## जिल्हा- भंडारा

इतिहास विभाग

सत्र २०२१-२२

बी. ए. अंतिम वर्ष (सहावे सत्र)

## "पवनी परिसरातील ऐतिहासीक स्तुपांच्या दुरावस्थेचे अध्ययन"

## विशेष संदर्भ :- पवनी परिसरातील स्तूप

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स पवनी, जिल्हा- भंडारा येथील इतिहास व प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व विभागांतर्गत बी. ए. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पवनी परिसरातील ऐतिहासीक स्तुपांच्या दुरावस्थेचे अध्ययनाकरीता पवनी परिसरातील ऐतिहासीक स्तुपांचे अध्ययन करून सर्वेक्षण अहवाल (Field work project) तयार केले. हे सर्वेक्षण दिनांक ०७/०७/२०२२ रोजी करण्यात आले. प्रस्तुत सर्वेक्षणाद्वारे विद्यार्थ्यांनी पवनी परिसरातील स्तुपांचे अध्ययन करून स्तुपासंदर्भातील समस्या, शासनातर्फे मिळालेल्या सोयी, सवलती या बदद्ल संपूर्ण माहिती मुलाखतीद्वारे घेवून सर्वेक्षण अहवाल तयार केलेला आहे. प्रस्तुत सर्वेक्षण अहवाल तयार करतांना विद्यार्थ्यांनी साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीद्वारे तथ्य संकलित करून विश्लेषण व स्पष्टीकरण करून निष्कर्ष, शिफारशी व सुचना दर्शविण्यात आले.

या निष्कर्षाद्वारे असे लक्षात आले की,

१) पवनी परिसरातील स्तुपांच्या दुरावस्थेमुळे गतकाळातील पवनी शहराचे ऐतिहासीक महत्व नष्ट झाले.

२) स्तुपांच्या दुरावस्थेमुळे येथील नागरिकांना आपल्या प्राचीन पवनी नगराचे महत्व समजण्यास अडचणी निर्माण झाल्या.

३) स्तुपांच्या दुरावस्थेमुळे आपला ऐतिहासीक वारसा जपण्याचे महत्व राहिले नाही.

४) ऐतिहासीक वारसा न जपल्याने पर्यटनाला खिळ बसली.

५) पर्यटनाला खिळ बसून बेरोजगारीच्या समस्या वाढल्या.

वरील निष्कर्षाद्वारे स्तुपासंदर्भातील समस्यांचे निराकरण करून विद्यार्थ्यांनी याबाबत काही उपाय योजना सूचविल्या.

**सुचना व शिफारशी :-**

१) पवनीतील ऐतिहासीक स्तुपांचा वारसा जपला जावा जेणेकरून भावी पिढीला आपल्या गतकाळातील इतिहासाची माहिती मिळेल.

२) पवनी परिसरातील स्तुपांच्या झालेल्या दुरावस्थेकडे प्रशासनाने लक्ष दयावे.

३) विशेषतः स्तुपांच्या समस्या निवारण्यासाठी पुरातत्व विभागास याचे संचालन देण्यात यावे.

४) पवनी परिसरातील सर्व स्तुपांचा वारसा जपून पर्यटनाची योग्य अशी सोय करावी.

५) पर्यटन वाढीमुळे रोजगाराच्या ब-याच संधी उपलब्ध होवू शकणार.

**निष्पत्ती :-**

१) विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्यात वाढझाली.

२) विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढला.

३) विद्यार्थ्यांना पवनी परिसरातील ऐतिहासीक स्तुपांच्या दुरावस्थेविषयी जाणीव झाली.

४) तथ्य मांडण्याचे कौशल्य विकसीत झाले.

५) विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाचा संग्रह निर्माण झाला.

इतिहास विभाग प्रमुख
प्रा. मंगेश गोपीचंद वाहाणे
डॉ. एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस
ॲण्ड कॉमर्स पवनी,जिल्हा- भंडारा

# प्रस्तावना

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स पवनी, जिल्हा- भंडारा येथील इतिहास व प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व विभागांतर्गत बी. ए. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पवनी परिसरातील ऐतिहासीक स्तुपांच्या दुरावस्थेचे अध्ययनाकरीता पवनी परिसरातील ऐतिहासीक स्तुपांचे अध्ययन करून सर्वेक्षण अहवाल (Field work project) तयार केले. ऐतिहासीक स्तुपांचे कमी होत चाललेले महत्व व त्यांची होत असलेली दुरावस्था या समस्यांच्या अध्ययनांतर्गत पवनी या शहराची निवड करण्यात आली. प्राचीन काळापासून ऐतिहासीक नगरीचे महत्व असलेल्या पवनीतील ऐतिहासीक स्तुपांची झालेल्या दुरावस्थाविषयीची माहिती घेऊन, त्या संदर्भातील समस्या व स्थानिक प्रशासनाद्वारे दुलर्क्षित झालेल्या स्तुपांकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी तसेच केंद्र व राज्य शासनातर्फे मिळणा-या सोयी, सवलतींचा लाभ मिळून स्तुपांचे योग्य जतन व्हावे याविषयी संपूर्ण माहिती घेवून सर्वेक्षण अहवाल सादर केलेला आहे.

महाराष्ट्र राज्यातील भंडारा जिल्हयातील पवनी नगरी विदर्भाच्या दक्षिण पूर्वेस असून येथील असंख्य मंदिरामुळे पवनी विदर्भाची काशी म्हणून ओळखली जाते. भंडारा जिल्हयातील एक महत्वपूर्ण तहसीलीचे ठिकाण वैनगंगा नदीच्या काठी पवनी हे नगर वसले असून नागपूरपासून दक्षिण-पूर्व ८५ किलोमीटर अंतरावर आहे तर भंडारा शहरापासून ४५ किलोमीटर अंतरावर आहे. पवनी नगरीत अनेक प्रसिद्ध अशी मंदीरे असून नगरात अनेक ठिकाणी गरूडध्वज पाहावयास मिळतात. पवनीच्या प्राचीन नावबद्दल विद्वानांमध्ये बरेच मतभेद आहेत. काही विद्ववानांच्या मते पवनीचे प्राचीन नाव ''कुशावती'' तर काही ठिकाणी ''पद्मावती'' असल्याचे म्हटले आहे. काही ठिकाणी ''पवरिका'' आणि ''पवनिक'' असा उल्लेख आढळतो. पूर्वी पवनीचे नाव लिहतांना ''पौनी'' असे लिहित असत. पण सध्या ''पवनी'' असेच नाव लिहिण्याची प्रथा रूढझालेली आहे.

उत्खन्नातील प्राप्त अवशेषांवरून पवनी ही नगरी इ.स. पूर्व ७ व्या शतकात समृद्ध होती किंबहुना ती याहीपेक्षा अधिक प्राचीन असावी कारण येथे पाषाणयुगीन माणसाची हत्यारे व वसाहत आढळलेली आहे. यावरून हा प्रदेश वैभव संपन्न असावा असे दिसते. उत्खन्नातील प्राप्त अवशेषावरून पवनी नगराचा बौद्ध धर्मांशी नजीकचा संबंध होता असेही दिसून पडते. तथागत बुद्धाचे अनुयायी बुद्धाची पूजा प्रतिक रूपाने करीत त्यापैकी बुद्ध जीवनाशी संबंधित अनेक प्रतिक जसे कमळ, वज्रासन, बोधिवृक्ष, धर्मचक्र उत्खन्नादरम्यान आढळून आली आहेत. तथागत गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर तथागतांच्या अस्थिंवर स्तुपांच्या निर्मितीस प्रारंभ झाला. त्यानुसार भारतात ठिकठिकाणी अनेक स्तुप बांधण्यात आले. अशाचपैकी काही स्तुप १९६९-७० दरम्यान पवनी येथील झालेल्या उत्खन्नात आढळून आले आहेत.

जगन्नाथ टेकडीच्या उत्खन्नात मिळालेले स्तूपाचे बांधकाम सर्वात आधी अशोक पूर्व काळात झाल्याचे आढळून आले. या स्तूपाला दगडी कठडा व चार दिशांना चार प्रवेशद्वारे बनविण्यात आलीत. ही प्रवेशद्वारे सांची व भारहूत प्रमाणेच नयनरम्य असावीत. वेगवेगळ्या राजवंशाच्या काळात या स्तूपाची पूजा व डागडूजी होत राहिली आहे. जगन्नाथ स्तूपाच्या दक्षिणेस सुमारे दिड किलोमीटर अंतरावर चांडकापूर परिसरात आणखी एक स्तूपावशेष मिळाले आहेत. ह्यास सुलेमान टेकडी या नावाने संबोधले जाते. या टेकडीची उंची सुमारे ९ मीटर होती. या स्तूपाची गणना भारतातील महास्तूपांमध्ये करता येते इतका मोठा त्याचा आकार आहे. येथील उत्खन्नातून एका मृदभांडामध्ये मानवी हाडांचे व दातांचे अवशेष मिळाले आहेत. मिळालेल्या अवशेषांवरून असे वाटते की हा स्तूप मुळात एखाद्या सुप्रसिद्ध बौद्ध भिक्षुंचे अवशेष जतन करण्यासाठी बांधण्यात आला असावा. पवनीपासून १ कि.मी. अंतरावर आणखी एक अर्धगोलाकार स्तूप सदृश्य उंचवटा असून याला हरदोलालाची टेकडी म्हणतात. येथील उत्खन्नात एक शिलालेख मिळाला होता. त्याच बरोबर येथे इ.स. पूर्व ३ -या शतकातील एक तांब्यांचे नाणे व एक छाया

स्तंभलेख मिळाला होता. त्यामुळे जगन्नाथ किंवा चांडकापूर स्तूपाप्रमाणेच ह्याचे अनन्य साधारण महत्त्व असावे.

अशा या ऐतिहासीक वारसा असलेल्या पवनीवर प्राचीन काळापासून अनेक राजवंशाची सत्ता राहिली असून या नगराची गणना प्राचीन काळातील विविध ऐतिहासीक नगरात होत असायची असे आढळून येते. बौद्ध धर्माच्या प्रभावाने बुद्ध अवशेषांवर स्तुपांच्या निर्मितीला सुरवात झाल्याने तसेच अनेक स्तूपांपैकी काही स्तूप पवनीतील उत्खन्नात आढळल्याने पवनीचे गतकाळातील समृद्धीची कल्पना येते. परंतू दूर्भाग्यवश पवनीतील उत्खन्नात आढळून आलेल्या स्तूपांची दुरावस्था पाहता तसेच प्रशासनाच्या दुलर्क्षीतपणा व उदासीनतेमुळे पवनीचे प्राचीन काळात राहिलेले महत्त्व संपुष्टात येत असल्याचे दिसून पडते.

# अध्ययन पद्धती

अध्ययन पद्धती :-

इतिहास हा अतिशय व्यापक विषय आहे. यामध्ये वैज्ञानिक व वस्तुनिष्ठ पद्धतीने एखादया घटनेचे अध्ययन करण्यात येते. इतिहासात संपूर्ण घटनांचे वर्णन आणि स्पष्टीकरण करण्यात येत असून प्रत्यक्ष निरिक्षणाद्वारे अभ्यास करण्यात येते.

एखादया घटनेचे अध्ययन हे जेव्हा निरीक्षण व प्रत्यक्ष मुलाखत पद्धतीने करण्यात येत असल्यामुळे कोणत्याही घटनांच्या समस्यांच्या अध्ययनाची उद्दिष्टे पूर्ण होण्यास काही अडथळे येत नसून त्या समस्येचे निराकरण, निष्कर्ष व त्यावर उपाययोजना तसेच शिफारशी करण्यास मदत मिळते. या अनुषंगानेच पवनी परिसराचे प्रत्यक्ष निरीक्षणाच्या माध्यमातून व नागरिकांच्या मुलाखतीद्वारे प्रश्नावली भरून या परिसराचे सर्वेक्षण करण्यात आले. या करीता बी.ए. अंतिम वर्षातील इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष निरीक्षण व प्रश्नावलीच्या सहायाने माहिती गोळा करून सर्वेक्षण अहवाल तयार करण्यात येईल.

याकरिता पुढील गोष्टींचा आधार घेण्यात आला.

१) प्रथमतः पवनी परिसरातील स्तुपांना प्रत्यक्ष भेट देण्यात येईल.

२) पवनी परिसरातील स्तुपांची माहिती जाणून घेण्यात येईल.

३) संबंधीत स्तूपांविषयी शासनाकडून मिळालेल्या सोई, सुविधा इ. विषयी माहिती जाणून घेण्यात येईल.

वरील प्रक्रियेनंतर सर्व विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष स्तूप असलेल्या परिसराला भेट देवून परिसरातील नागरिकांना सर्वेक्षणाचा उददेश सर्वप्रथम समजावून सांगितला. स्तूप परिसरातील नागरिकांशी सलोख्याची भावना निर्माण केली. त्यांच्या समस्येविषयी माहिती घेवून प्रश्नावली भरून घेतली.

**विषयाची निवड :-**

प्रस्तूत विषय ''पवनी परिसरातील ऐतिहासीक स्तुपांच्या दुरावस्थेचे अध्ययन'' याकरिता पवनी परिसरातील असलेल्या स्तूपांच्या समस्यांचे अध्ययन करून त्याचे निरसन कसे करता येईल या करीता या ठिकाणाची निवड करण्यात आली.

## अध्ययनाचे (सर्वेक्षणाचे) उद्देश

१) पवनी परिसरातील स्तूपांच्या दुरावस्थेसंबंधी अहवाल तयार करून शासनाच्या निर्दशनास आणणे.

२) शासनातर्फे मिळणा-या पायाभुत सोयी, अनुदान याबाबतचे अध्ययन करणे.

३) स्तुप असलेल्या परिसरातील नागरीकांच्या मतांचे अध्ययन करणे.

# विश्लेषण

संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण हे उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीवरून विश्लेषण करण्यात आलेले आहे. मुलाखतीच्या माध्यमातून मुलाखतदात्यांना प्रश्न विचारून तथ्ये संकलित करून त्या तथ्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

पवनी परिसरातील स्तूपांविषयीची माहिती विद्यमान परिस्थीतीत स्तूप असलेल्या परिसरातील नागरिकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेवून तसेच शासनांच्या सोयी, सुविधा बाबतची माहिती व स्तुपांची योग्य देखभाल करण्यासंदर्भात उत्तरदात्यांकडून विचारण्यात आली व त्यानुसार तथ्ये गोळा करून त्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

## सर्वसामान्य निष्कर्ष

उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीवरून तसेच त्यांच्या घेतलेल्या मुलाखतीच्या माध्यमातून खालीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले आहे.

१) उत्तरदाते हे उच्चशिक्षित, सधन घटकातील असनु परिसरातील स्तुपांविषयी त्यांना बहुतांश माहिती आहे.

२) स्तुपांच्या संवर्धनासाठी अनुदान प्राप्त झाले नाही.

३) पुरातत्व विभागाद्वारे स्तूपांची पाहणी करण्यासाठी अधिका-यांनी स्तुपांना भेट दिली नाही.

४) पवनी परिसरातील नागरिकांमध्ये आपल्या ऐतिहासीक वास्तुंच्या संवर्धनासंदर्भात उदासीन आढळून आली.

५) स्तुपांचे संवर्धन करून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात स्थानिक प्रशासन कमी पडले.

६) पुरातत्व विभाग तसेच स्थानिक प्रशासनाचेही या ऐतिहासीक स्तुपांकडे दुर्लक्ष झाले आहे.

# डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स पवनी,

जिल्हा- भंडारा

इतिहास विभाग

सत्र २०२१-२२

बी. ए. अंतिम वर्ष (सहावे सत्र)

## सर्वेक्षण अहवाल

''पवनी परिसरातील ऐतिहासीक स्तुपांच्या दुरावस्थेचे अध्ययन''

विशेष संदर्भ :- पवनी परिसरातील स्तूप

बी. ए. अंतिम वर्षाचे विद्यार्थी

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | विद्यार्थ्यांची स्वाक्षरी |
|---|---|---|
| ०१ | कु. शिवानी पारधी | S.Parade |
| ०२ | कु. तृप्ती मोटघरे | Trupti Motghare |
| ०३ | कु. शिल्पा मेश्राम | Shilpa Meshram. |
| ०४ | कु. अर्पिता सुरकर | A.Surkar |
| ०५ | कु. गायत्री रेडड्ी | R.Reddye |
| ०६ | हर्षल दाणी | Harvani |
| ०७ | चेतन चोपकर | Chetan Chopkar |
| ०८ | निमेश वाढई | [illegible] |
| ०९ | कु. पुनम मेश्राम | P. Meshram |
| १० | भूमेश गजबे | [illegible] |

:: मार्गदर्शक ::

इतिहास विभाग प्रमुख

प्रा. मंगेश गोपीचंद वाहाणे

डॉ. एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस

ॲण्ड कॉमर्स पवनी,जिल्हा- भंडारा




JagannathStupasinPauni



Suleman(Tekdi)StupasinPauni



HadolalaStupasinPauni



# StudentSurvey






# सर्वेक्षण अहवाल

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर

डॉ. एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स,पवनी, जि. भंडारा

अर्थशास्त्र विभाग

सत्र– २०२२– २०२३

## बी. ए. 6th Semester

*''पवनी येथील मिरची खुडनी व्यवसायात काम करणार्या मजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास''*

विशेष संदर्भ – ( आर्थिक आणि सामाजिक सर्वेक्षण )

सादरकर्ता

अर्थशास्त्र विभाग

बी.ए. **6th Semester** चे विद्यार्थी

– मार्गदर्शक ––

प्रा. नंदकिशोर प्रे. सिंगाडे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

डॉ. एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स,पवनी, जि. भंडारा

**Dr. L. D. Balkhande College of Arts and Commerce, Pauni, Dist. Bhandara**

**Department of Economics**

**Session: 2022-23**

**Survey Report**

# "Study of Economical and Social Problems of Laborers Working in Chili plant at Pauni"

**Special reference • Pauni**

**(Social, Economic Survey Report)**

Under Economics Department B. A. six semester students prepared a survey report (Field work) by studying the economic and social problems of the laborers working in Pauni to study the problems faced by the laborers working in the chilli plant. For this survey B.A. 30 students of Six Sem participated and students were divided into three groups each. Through the present survey, the students have prepared a complete information through interview about the financial, social, family, educational, health problems of the workers working in the chili plant and also about the facilities, concessions and benefits received by the government. While preparing the present survey report, the students collected facts through simple random sample selection method, coded through classification, analyzed and explained through tables through master chart, verified the previously presented hypothesis and suggested conclusions and suggestions.

From the above findings, it was observed that,

1. Majority of respondents belong to female group.

2.Most of the respondents have secondary and higher secondary education.

3. The work of all the respondents is seasonal in nature.
4. Maximum of respondents have monthly income above 10000 rupees.

5. The number of respondents below poverty line is highest.

## Measures

1. Laborers should be remunerated fairly.

2. Seasonal labor should be guaranteed employment.

3. By providing legal security and protection to seasonal labourers to give

4. Conveniences should be provided like other permanent workers.

5 To provide permanent employment.

Thus various remedial measures were suggested and then a report was prepared based on the survey conducted by the college and submitted to the principal of the college. 30 students participated in preparing this report.

**Result:-**

1. Art of fact gathering developed among students.

2. Increased confidence among students.

3. Skill in presentation of facts developed. 4. A collection of knowledge was created among the students.

5. Increased communication skills among students

6. Realized the pressing problem of laborers.

| | | | |
|---|---|---|---|
| 08-09-2022 | International Literacy Day (Sickle cell, TB & Leprosy) | NSS | 25 |
| 28-09-2022 | Carrot Grass Plastic Management Programme | NSS | 152 |
| 29-09-2022 | Right to Information & Law Day | NSS | 75 |
| 30-10-2022 | National Unity Day – Ekta Daud | NSS | 102 |
| 13-12-2022 | Cleanliness Campaign | NSS | 210 |
| 15-12-2022 | Blood Donation | NSS | 11 |
| 31-12-2022 | Red Ribbon Program - Aids awareness | NSS | 178 |
| 03-01-2023 | Woman Empowerment (Savitribai Phule Jayanti) | NSS | 179 |
| 10-01-2023 | Social Enlightenment – Sangeet Rajani | NSS | 350 |
| 20-01-2023 | Marathi Language Conservation Fortnight | NSS | 159 |
| 21-01-2023 | Awareness of Road Safety Week through street drama | NSS | 289 |
| 25-01-2023 | National Voters Day | NSS | 158 |
| 26-01-2023 | Republic Day- (Patriotic Song) | NSS | 109 |
| 16-02-2023 To 23-02-2023 | Tree Conservation Cleanliness Week Programme | NSS | 187 |
| 27-02-2023 | Employment Fair | NSS | 50 |
| 08-03-2023 | International Women's Day | NSS | 145 |

**Link -----**

Principal
Dr. L.D. Balkhande
College of Arts and Comm
Pauni, Dist. Bhandara

# सर्वेक्षण अहवाल

## ''पवनी येथील मिरची खुडनी व्यवसायात काम करणार्या मजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास''

''विशेष संदर्भ : पवनी गाव

( आर्थिक व सामाजिक  सर्वेक्षण अहवाल)

अर्थशास्त्र विभाग

सत्र २०२२– २०२३ **B.A- 6th** सेमिस्टरचे विद्यार्थी

बी. ए. भाग ३

प्रस्तुत सर्वेक्षणाची रूपरेषा ही बी.ए. सिक्स सेमिस्टर विभागाच्या विद्यार्थ्यांना संशोधनाकरिता तसेच सर्वेक्षण अहवाल करण्याकरिता जिज्ञासा निर्माण व्हावी. तसेच  मजुरांच्या समस्येविषयीची जाणीव निर्माण व्हावी, विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वास वाढून त्यांच्यातील संवाद कौशल्यात वाढ व्हावी या उद्देशाने घेण्यात आले आहे. तसेच मिरची व्यवसायात काम करणा—या मजुरांच्या आर्थिक, सामाजिक, मानसिक, कौटुंबिक तसेच आरोग्यांविषयी समस्येचे अध्ययन करून त्याद्वारे उपाययोजना, सुचना, शिफारशी, निष्कर्ष काढण्यात आले आहे.

अहवाल तयार करण्याकरिता ३० विद्यार्थ्यांचा सहभाग लाभलेला असून त्यांची ३ गटात विभागणी करण्यात आली. प्रस्तुत सर्वेक्षणाद्वारे पवनी येथील मिरची खुडणी व्यवसायात काम करणा—या मजुरांची वैयक्तिक, आर्थिक व सामाजिक तसेच इतर सोयी सुविधा बाबतचे संपूर्ण माहीती घेण्यात आली असून,मुलाखत अनुसूचिद्वारे सारण्या तयार करून सर्वेक्षण अहवाल तयार करण्यात आला.

प्रस्तुत सर्वेक्षण अहवाल बी.ए. सिक्स सेमिस्टर चे विद्यार्थी महाविद्यालयात सादर करित आहोत.

सर्वेक्षण अहवाल

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर

डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स,

पवनी, जि. भंडारा

# डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स पवनी जि– भंडारा

## अर्थशास्त्र विभाग

## सत्र २०२२–२३

## सर्वेक्षण अहवाल

## ''पवनी येथील मिरची खुडनी व्यवसायात काम करणार्या मजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास

डॉ एल डी बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स पवनी जि भंडारा अर्थशास्त्र विभागांतर्गत बी ए सिक्स सेमिस्टर विद्यार्थ्यांनी मिरची खुडणी व्यवसायात काम करणाऱ्या मजुरांना निर्माण होणाऱ्या समस्यांच्या अध्यपनाकरीता पवनी येथील काम करणार्या मजुरांचे आर्थिक आणि सामाजिक समस्येचे अध्ययन करून सर्वेक्षण अहवाल (Field work) तयार केले पा सर्वेक्षणाकरिता बी ए सिक्स सेम च्या ज्ञ विद्यार्थ्यांचा सहभाग लाभलेला असून विद्यार्थ्यांचे प्रत्येकी तीन गटांमध्ये विभागणी करण्यात आले प्रस्तुत सर्वेक्षणाद्वारे विद्यार्थ्यांनी मिरची खुडनी व्यवसायात काम करणाया कामगारांच्या आर्थिक सामाजिक कौटुंबिक शैक्षणिक आरोग्याविषयक समस्येबद्दल तसेच शासनातर्फे मिळालेल्या सोयी सवलती, लाभ या बद्दल संपूर्ण माहीती मुलाख अनुसुचिद्वारे घेवून सर्वेक्षण अहवाल सादर तयार केलेला आहे प्रस्तुत सर्वेक्षण अहवाल तयार करताना विद्यार्थ्यांनी साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीद्वारे तथ्य संकलित करून वर्गीकरणाच्या माध्यमातून सांकेतीकरण करून मास्टर चार्टद्वारे सारण्यांच्या माध्यमांतून विश्लेषण व स्पष्टीकरण करून पूर्वी मांडण्यात आलेल्या गृहीत कृत्याचा पडताळा घेवून निष्कर्ष शिफारशी सुचना दर्शविण्यात आले.

वरील निष्कर्षाद्वारे लक्षात आले की.

१ बहुसंख्य उत्तर दाते हे स्त्री गटातील आहे.

२.जास्तीत जास्त उत्तरदाते हे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे

३.सर्वच उत्तरदात्यांचे काम हे हंगामी स्वरूपाची आहे

४.जास्तीत जास्त उत्तरदात्यांचे मासिक उत्पन्न १००००रुपयाचे वर आहे.

५. दारिद्र रेषेखालील उत्तरदात्यांची संख्या सर्वात जास्त आहे

६. कनिष्ठ राहणीमान असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या जास्त आहे

७. जास्तीत जास्त उत्तरदात्यांकडे उत्पन्नाची इतर कोणतेही साधने नाहीत

८. जास्तीत जास्त उत्तरदाते हे ७ ते ९ तास काम करतात

९ कामाच्या ठिकाणी कोणत्याही सोपी नाहीत

१० सर्वच उत्तरदात्याना त्यांच्या इच्छेनुसार काम दिले जाते

११.सर्वच उत्तरदात्यांना नियमित काम मिळत असते

१२.कामाच्या ठिकाणी कोणत्याही आरोग्याच्या सोपी उपलब्ध नाहीत

१३. सर्वात जास्त उत्तरदाते आर्थिक स्थिती सुधारली म्हणणारी आहेत

१४ सर्वच उत्तरदात्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही वस्तूंचा पुरवठा केला जात नाही.

१५ जास्तीत जास्त उत्तरदात्यांच्या राहणीमानात सुधारणा होत आहे

१६ हंगामी काम असल्यामुळे जास्तीत जास्त उत्तरथा त्यांना असुरक्षितता वाटते

१७ जास्तीत जास्त उत्तरदात्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होताना दिसून येतो

उत्तर दातांच्या आर्थिक सामाजिक शैक्षणिक व आरोग्य विषयक आणि कौटुंबिक समस्यांच्या निराकरण करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यायिांनी काही उपाययोजना सुचवलेल्या आहे त्या पुढील प्रमाणे उपाययोजना

१. मजुरांना योग्य तो मोबदला देण्यात यावा

२. हंगामी मजुरांना कामाची हमी मिळवून द्यावी

३. हंगामी मजुरांना कायद्याची सुरक्षा व संरक्षण मिळवून द्यावे

४. इतर स्थायी मजुरांप्रमाणे सोयी सवलती मिळवून द्यावी

५. स्थायी रोजगार मिळवून देणे

६. व्यवसायातील ठेकेदार तसेच मजूर यांचे मध्ये सल्लागार समितीची स्थापना करून समन्वय प्रस्थापित करणे आवश्यक आहे

७. हंगामी मजुरांच्या समस्या सोडवण्यासाठी एक समन्वय समिती स्थापन करावी

८. कामाच्या ठिकाणी प्रथमोपचार आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने पुरेशा सोयी उपलब्ध करून द्यावी

९. पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध करून द्यावे

१०. स्वच्छतागृह उपलब्ध करून द्यावी

अशाप्रकारे विविध उपायोजना सूचना सुचविल्या गेल्या आणि त्यानंतर महाविद्यालयाद्वारे आयोजित सर्वेक्षणाचे आधारे अहवाल तयार करून महाविद्यालयाचे प्राचार्य यांना सादर करण्यात आला हा अहवाल तयार करण्यासाठी ३० विद्यार्थ्याचा सहभाग लाभला

निष्पत्ती

१ विद्यार्थ्यामध्ये तथ्य संकलनाची कला विकसित झाली

२ विद्यार्थ्यामधील आत्मविश्वास वादला

३तथ्य मांडण्याचे कौशल्य विकसित झाले

४.विद्यार्थ्यामध्ये ज्ञानाचा संग्रह निर्माण झाला

५ विद्यार्थ्यामध्ये संवाद कौशल्यात वाढ झाली.

६ मजुरांच्या हार्दिक समस्येची जाणीव झाली

अर्थशास्त्र विभागप्रमुख

प्रा नंदकिशोर प्रे सिंगाडे

डॉ एल डी बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स

अँड कॉमर्स पवनी जिल्हा भंडारा

# अर्थशास्त्र विभाग

## सत्र २०२२–२३

## बी. ए. सिक्स सेमिस्टर

## ‘‘पवनी येथील मिरची खुडनी व्यवसायात काम करणा–या मजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास’’

विशेष संदर्भ : पवनी गाव

(सामाजिक, आर्थिक सर्वेक्षण अहवाल)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर अंतर्गत

डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स, पवनी, जि. भंडारा.

अर्थशास्त्र विभागांतर्गत बी. ए. सिक्स सेमिस्टर विद्यार्थ्यांनी मिरची खुडणी व्यवसायात काम करणा–या मजुरांना निर्माण होणा–या समस्यांच्या अध्ययनाकरीता पवनी येथील काम करणार्या मजुरांचे आर्थिक आणि सामाजिक समस्येचे अध्ययन करून सर्वेक्षण अहवाल (Field work project) तयार केले. या सर्वेक्षणाकरिता बी.ए. सिक्स सेम च्या ३० विद्यार्थ्याचा सहभाग लाभलेला असून विद्यार्थ्यांचे प्रत्येकी तीन गटांमध्ये विभागणी करण्यात आले. प्रस्तुत सर्वेक्षणाद्वारे विद्यार्थ्यानी मिरची खुडनी व्यवसायात काम करणा–या कामगारांच्या आर्थिक, सामाजिक कौटुंबिक, शैक्षणिक, आरोग्याविषयक समस्येबद्दल तसेच शासनातर्फे मिळालेल्या सोयी, सवलती, लाभ या बद्दल संपूर्ण माहीती मुलाखत अनुसुचिद्वारे घेवून सर्वेक्षण अहवाल सादर तयार केलेला आहे. प्रस्तुत सर्वेक्षण अहवाल तयार करताना विद्यार्थ्यांनी साधा याइच्छिक नमुना निवड पद्धतीद्वारे तथ्य संकलित करून, वर्गीकरणाच्या माध्यमातून सांकेतीकरण करून मास्टर चार्टद्वारे सारण्यांच्या माध्यमांतून विश्लेषण व स्पष्टीकरण करून पूर्वी मांडण्यात आलेल्या गृहीत कृत्याचा पडताळा घेवून निष्कर्ष शिफारशी, सुचना दर्शविण्यात आले.

## मनोगत

''मिरची व्यवसायात काम करणा—या मजुरांना निर्माण होणान्या समस्येचे अध्ययनाकरिता पवनी या गावाची आर्थिक व सामाजिक सर्वेक्षणाकरिता निवड केली गेली. आर्थिक, सामाजिक सर्वेक्षण अहवाल सादर करतांना बी. ए. ६ वे सेमिस्टर अर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांना अत्यंत आनंद होत आहे. विद्यार्थ्यांनी मिरची खुडणी व्यवसायात काम करणा—या मजुरांना निर्माण होणा—या सामाजिक,आर्थिक,कौटुंबिक, मानसिक, शैक्षणिक समस्यांची माहिती जाणून घेतली तसेच त्यांना मिळणा—या सोयी, लाभ, सवलतीबद्दल मजुरांमार्फत माहिती घेवून सर्वेक्षण अहवाल सादर करण्याचा एक प्रयत्न केला आहे.

याकरिता सर्वप्रथम आमच्या आभारास पात्र असलेली प्रथम व्यक्ती अर्थशास्त्र विभाग प्रमुख मा. प्रा. नंदकिशोर सिंगाडे यांचे आम्हाला बहुमुल्य मार्गदर्शन लाभले त्यांचे आम्ही सर्व विद्यार्थी आभारी आहोत. त्याबद्दल तसेच मिरची व्यवसायात काम करणारी मजूर, पुढारी, सुपरवाईजर, ठेकेदार, मैनेजर यांनी खुडणी व्यवसायाविषयी विशेष माहिती देवून प्रत्यक्ष मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे मोलाचे सहकार्य केले त्यांचे सर्व विद्यार्थ्यातर्फे मनस्वी आभार.

वरील सर्वांच्या सहकार्याची प्रेमाची आदराची भावना आम्हास विसरून चालणार नाही. त्यांच्या अमुल्य सहकार्यानो मजुरांच्या आर्थिक, सामाजिक सर्वेक्षण अहवाल सादर करू शकलो. त्यामुळे आम्ही सर्व बी.ए. सिक्स सेम अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थी सर्वांचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो. आपण सर्वानी अविस्मरणीय सहकार्य सदैव संस्मरणीय राहणार.

**संशोधक विद्यार्थी**

बी. ए. सिक्स सेमिस्टर अर्थशास्त्र विभाग

<u>अनुक्रमणिका</u>

प्रकरण पहिले :— प्रस्तावना
प्रकरण दुसरे :— अध्ययन पद्धती
प्रकरण तिसरे :— विश्लेषण आणि नीर्वचन
प्रकरण चौथे :— अ) सर्वसामान्य निष्कर्ष आणि उपाय योजना
ब. उपकल्पनांचा पडताळा/ गृहीतकृत्ये
क. माहिती, शिफारसी
ड. सर्वेक्षणाचा अहवाल
परिशिष्ट
अ. मुलाखत अनुसूची
ब. मुलाखत छायाचित्रे

## प्रकरण पहिले

### प्रस्तावना –

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर अंतर्गत डॉ. एल.डी बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स पवनी, जिल्हा भंडारा अर्थशास्त्र विभाग अभ्यासातंर्गत बी.ए. सिक्स सेमिस्टरच्या विद्यार्थ्यांना मिरची खुडणी व्यवसायात काम करणाच्या मजुरांच्या समस्येचे अध्ययन करण्याकरिता सर्वेक्षण अहवाल (Field Work) देण्यात आले. याकरिता, आर्थिक, सामाजिक, जीवन कशाप्रकारचे आहे, त्यांच्या सामाजिक, आर्थिक, आरोग्याविषयी समस्यांची माहिती घेऊन, तसेच कामाच्या ठिकाणी मिळालेले लाभ, इतर लाभ मजुरांना होतो की नाही याविषयी संपूर्ण माहिती घेवून सर्वेक्षण अहवाल सादर केलेला आहे.

एखादया क्षेत्राला प्रत्यक्ष भेट देवून निरीक्षणाद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारावर सविस्तर अनुभवाद्वार तथा शास्त्रीय दृष्टीने केला जाणारा अभ्यास म्हणजे क्षेत्रीय अभ्यास होय.

भारतातून लाल मिरचीची मागणी आणि निर्यात सातत्याने वाढत आहे, ज्याचा फायदा देशभरातील शेतक–यांना होत आहे. नागपूरची कळमना बाजारपेठ समाधानकारक किमंतीत लाल मिरचीचा प्रमुख स्त्रोत आहे आणि २०१९ पासून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय मिरचीची मागणी वाढत आहे. परदेशात चांगली मागणी वाढल्याने मिरचीच्या शेतक–यांसाठी तसेच मिरची व्यवसायात काम करणा–या मजुरांचे आतापर्यंतचे वर्ष चांगले गेले आहे.

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारताने आर्थिक विकासाचा मोठा टप्पा पूर्ण केला असला तरी अजूनही ६० ते ७० प्रतिशत लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. या लोकसंख्येचे उत्पन्नाचे प्रमुख साधन शेती आहे, अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मुलभूत गरजांपैकी अन्नाची गरज शेती पूर्ण करते. त्यामुळे देशाच्या विकासात शेतीला प्रथम स्थान आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास शेतीवर अवलंबून आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा १८.५ प्रतिशत इतका आहे. व्यवसायास लागणारा कच्चा माल शेतीमधून पुरविला जातो. तसेच उद्योगांच्या दृष्टीने शेती व्यवसाय महत्वाचा आहे. शेतमजूर हा भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेचा आणि खेडे विभागातील आर्थिक व सामाजिक जीवनाचा एक अभिन्न व महत्वपूर्ण घटक आहे. नियोजन मंडळाच्या मते शेतमजूरांचा प्रश्न म्हणजे एक नि:संदिग्ध आव्हानच आहे आणि हया प्रश्नाची समाधानकारक सोडवणूक करण्याचे उत्तरदायित्व संपूर्ण समाजावर आहे.

भारतासारख्या कृषीप्रधान देशात तो व्यवसायाचा मुख्य आधारस्तंभ शेतमजूर असून शेतीची उत्पादकता मजूरांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून आहे. शेतीच्या उत्पन्नावर मजूरांच्या विकास आधारतेला असतो परंतु दुर्दैवाने निकृष्ट राहणीमान व आर्थिकदृष्या मागासलेपणा यामुळे शेतमजुरांचे स्थान निम्न स्वरुपाचे आहे. उद्योगप्रधान देशाच्या तुलनेत भारतासारख्या कृषीप्रधान अर्थव्यवस्था असलेल्या देशात मजूरांच्या वर्गाचा आकार देशाची लोकसंख्या लोकसंख्या वाढीचा

दर, शेतीवर अवलंबून असणा—यांचा भार शेतीची स्थिती. शेतीमध्ये करण्यात येणारा यंत्राचा उपयोग, ग्रामीण विभागात जनतेला उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या सोयी व नागरीकरणाची प्रक्रीया अशा अनेक बाबीवर अवलंबून आहे. सन २०२१ मध्ये भारतात एकूण काम करणा—या शेतमजूरांचे प्रमाण २६.६२ प्रतिशत इतके होते. महाराष्ट्र राज्यात सन २००१ मध्ये एकूण क्रियाशील लोकसंख्येत शेतमजुरांचे प्रमाण २६.६२ प्रतिशत इतके होते. सन २००१ मध्ये विदर्भात एकूण काम करणारा वर्ग ७२.१२ इतका असून यात एकूण कम करणारे शेतमजूर २६. २७ इतके होते. हे प्रमाण ३६.४३प्रतिशत इतके, भंडारा जिल्हयाची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था आहे. जिल्हयातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे.

पवनी तालुक्यातील जवळजवळ ७० प्रतिशत लोकांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे. तालुक्यात भात हे प्रमुख पिक असून सोयाबीन, तूर, गहू, हरभरा, हळद इत्यादी पिके घेतली जातात. पवनी तालुक्यातील मजूरांवर अनुकुल परिणाम होणे अपेक्षीत आहे.

शासनाने मजुरांच्या स्थितीचा आढावा घेवून त्यांच्या स्थितीत सुधारणा होण्यासाठी विविध योजना राबविल्या आहेत. या योजनांचा मजूरांवर अनुकुल परिणाम झाला आहे का? योजनांचा लाभ मजूरांनी घेतला आहे का? मजूरांना कायम स्वरुपी रोजगार मिळतो का? मजूरांना किती रोजगार मिळतो? मजुरीचे दर किती आहेत?, मजूरांच्या संख्येत वाढ झाली आहे का? त्यांचे उत्पन्न वाढले आहे का? मजूरांच्या राहणीमानात वाढ झाली आहे का? मजूरांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे का? मजूरांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारली आहे का? या सर्व बाबींचा अभ्यास करणे हा या लघु सर्वेक्षणाचा प्रमुख हेतू आहे.

१) मिरची खुडणी व्यवसायातील रोजगारीचा अभ्यास करणे.

२) मजूरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

३) मिरची खुडणी मजूरांच्या बेरोजगारीचा व अर्धबेरोजगारीचा अभ्यास करणे.

४) मिरची खुडणी मजूरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे. प्रस्तुत अध्ययन करण्यासाठी प्रामुख्याने साधन सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.

मजूरांच्या आर्थीक व सामाजिक स्थितीचे, त्यांच्या समस्यांचे अध्ययन करण्याकरीता नमुना पध्दतीने प्रश्नावली मुलाखत या पध्दतीच्या साह्याने माहिती प्राप्त करण्यात आली. मिरची खुडणीव्यवसायातील मजूरांची माहिती प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राप्त करण्यात आली. विश्लेषणासाठी सारणीपण, प्रतिशत प्रमाण व सांख्यीकीय साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. मजूरांमध्ये भूमिहीन शेतमजूरांचे प्रमाण अधिक आहे. मजूरांमध्ये निरक्षरता अधिक आहे. मजूरांना हंगामी रोजगार मिळत असून मजुरीचे दिवस अल्प आहेत. या मजूरांना मिळणारी मजूरी किमान वेतन दरापेक्षा कमी मिळते. त्यामुळे उत्पन्नाचे प्रमाण अल्प आहे.

मजूर हा देशाच्या राष्ट्रीय उत्पादन प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभागी होऊन भूमिका पार पाडत आहे. त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करून राहणीमानात वाढ करण्यासाठी आणखी प्रयत्न लागणार असून त्याची माहीती मजूरांपर्यंत पोहचविणे हे सुद्धा महत्त्वाचे आहे.

गावाची निवडः (पवनी)

महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागातील बी.ए. सिक्स सेम. च्या विद्यार्थ्यांना पवनी येथील मिरची खुडणी व्यवसायातील काम करणा–या मजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांच्या अध्ययनाकरिता सर्वेक्षण अहवाल देण्यात आला असून त्याकरिता विद्यार्थ्यायांनी सर्वेक्षणाकरिता पवनीतील २ मिरची खुडणी व्यवसायाची निवड केली. या मिरची खुडणी व्यवसायात काम करणा–या हंगामी मजुरांची संख्या २७९ आहे.

पवनी हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील भंडारा जिल्हयात असलेले एक शहर आहे. पवनी वैनगंगा नदीच्या तटावर दक्षिण गंगा म्हणून ओळखले जाते. हे आसपासच्या छोटया गावांसाठी बाजारपेठेचे केंद्र आहे. पवनीला टोपणनावाने 'विदर्भ काशी' म्हणून ओळखले जाते. पवनीची एकूण लोकसंख्या २२,८२१ आहे.

प्राचीन काळात, पवनी हे हेंडलूम वस्त्र उद्योगासाठी प्रसिद्ध होते. पवनी हे तीर्थस्थान आहे. आणि अनेक मंदिरे, शाळा हायस्कूल, महाविद्यालये आहेत. राजा पवन यांनी काही वर्षांपूर्वी या शहरावर राज्य केले. शहरात प्रवेश केल्यावर किल्ल्याचा एक मोठा प्रवेशद्वार दिसतो. मौर्य काळापासून थेट नागपूरकर भोसल्यांच्या इतिहासाची साक्ष देणारा पवन राजाचा पवनी येथील किल्ला पर्यटकांना खुणावत आहे. वैनगंगेच्या विशाल तीरावरील डोंगर माथ्यांनी वेढलेल्या या परिसरात सम्राट अशोकांचे काही काळ वास्तव्य होते. भंडारा जिल्हाचा समृद्ध वारसा सांगणारा हा किल्ला आजही अभ्यासकांसाठी पर्वणी आहे. भंडारा जिल्हा मुख्यालयापासून ४२ किमी. अंतरावर पवनी तालुक्याचे ठिकाण आहे. पवन राजाच्या नावावरूनच या गावाला पवनी असे नाव पडले. पवनी हे हीनयान पंथाचे आराधना केंद्र होते. अशोकाच्या काळात भरभराटीस आले होते. सम्राट अशोकांनी येथे काही काळ वास्तव्य केले. त्यांची मुलगी संघमित्रा याचठिकाणावरून श्रीलंकेला धर्म प्रसारासाठी गेल्याचे इतिहास सांगते. या किल्ल्याचे वैशिष्टय म्हणजे इ.स. पूर्व पहिल्या शतकातला शत्रकुमार रुपाअम्माचा स्तंभलेख येथे उत्खननात आढळला. आज तो नागपूरच्या वस्तुसंग्रहालयात या परिसराचे वैभव सांगते.

पवनी येथील मिरची खुडणी व्यवसायातील काम करणा–या मजुरांचा आर्थिक सामाजिक तसेच सांस्कृतिक व इतर समस्या मोठया प्रमाणात मजुरांना भेडसावत असल्यामुळे विद्यार्थ्यानी या गावाची निवड केली आहे.

प्रकरण: दुसरे

## अध्ययन पद्धती :–

अर्थशास्त्र हा अतिशय व्यापक आणि शास्त्रीय विषय आहे. यामध्ये वैज्ञानिक व वस्तुनिष्ठ पद्धतीने एखादया घटनेचे अध्ययन करण्यात येते. अर्थशास्त्रात संपूर्ण समाजाचे व्यवस्थितरित्या वर्णन आणि स्पष्टीकरण करण्यात येत असून प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे अभ्यास करण्यात येते.

एखादया घटनेचे अध्ययन हे जेव्हा निरीक्षण व प्रत्यक्ष मुलाखत पद्धतीने करण्यात येत असल्यामुळे कोणत्याही घटनांच्या समस्यांच्या अध्ययनाची उद्दिष्टे पूर्ण होण्यास काही अडथळे येत नसून त्या समस्येचे निराकरण, निष्कर्ष व त्यावर उपाययोजना तसेच शिफारशी करण्यास मदत मिळते. या अनुषंगानेच याकरिता बी. ए. सिक्स सेमिस्टर मधील ३० विद्यार्थ्यांचे ०३ गटामध्ये विभाजन करून प्रत्यक्ष निरीक्षण व मुलाखत अनुसूची सहाय्याने माहिती जमा करून सर्वेक्षण अहवाल तयार करण्यात येईल. याकरिता पुढील गोष्टींचा आधार घेण्यात आला.

१. सर्वप्रथम पवनी ची सीमा निश्चित करण्यात येईल.
२. पवनी मध्ये किती मिरची खुडणी व्यवसाय आहेत यांची माहिती जाणून घेण्यात येईल.
३. मिरची खुडणी केंद्रातील मजुरांच्या समस्यांची, मिळालेल्या सोई, इ. याविषयी माहिती जाणून घेण्यात येईल.
४. सर्वेक्षण करणा–या विद्यार्थ्यांचे एका गटात १० विद्यार्थी याप्रमाणे गट तयार करण्यात आले. वरील प्रक्रियेनंतर सर्व विद्यार्थ्यांनी गटागटाने मिरची खुडणी व्यवसायातील मजुरांशी प्रत्यक्ष भेट घेवून त्यांना सर्वेक्षणाचा उद्देश सर्वप्रथम समजावून सांगितला. त्यांचे सोबत चर्चा करून सलोख्याची भावना निर्माण केली. त्यांच्या समस्येविषयी माहिती घेवून प्रश्नावली भरून घेतली.

प्रश्नावलीनुसार सारण्या तयार करण्यात आल्या व प्राप्त सारणीच्या आधारे अहवाल तयार करण्यात आला. यात अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.नंदकिशोर सिंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार्य लाभले.

## विषयाची निवड :–

प्रस्तुत विषय पवनी येथील मिरची खुडणी व्यवसायात काम करणा–या मजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास याकरिता पवनीची निवड करण्यात आली.

## समस्यासुत्रन

''पवनी येथील मिरची खुडणी व्यवसायात काम करणार्या मजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास''

(पवनीचा सर्वेक्षण अहवाल)

**विशेष संदर्भ–**

पवनी येथील आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण

**साहित्यिक चाचणी:–**

प्रस्तुत सर्वेक्षणासाठी आम्ही अर्थशास्त्र विषयातील सिक्स सेमिस्टरचे विद्यार्थी असुन, मिरची खुडणी व्यवसायात काम करणा–या मजुरांना निर्माण होणा–या समस्या जाणून घेतले. त्यानुसार मुलाखत अनुसूची तयार करून साहित्यांचे परिक्षण करण्यात आले.

**अध्ययनाचे (सर्वेक्षणाचे) उद्देश :–**

१. मजुरांच्या वैयक्तिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२. मजुरांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

३. मजुरांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.

४. मजुरांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.

५. मजुरांच्या निवास विषयक सोयींचे अध्ययन करणे.

६. मजुरांना देण्यात येणा–या कामाविषयीचे अध्ययन करणे.

७. मजुरांच्या कार्यस्थितीचे अध्ययन करणे.

८. कामगारांच्या कामासंबंधी असणारे अध्ययन करणे.

९. मजूर आणि व्यवस्थापन तसेच कंत्राटदार व मॅनेजर यांच्याशी असणा–या संबंधाची अध्ययन करणे.

१०. मजुरांना देण्यात येणा–या सेवा व सुविधांचे अध्ययन करणे.

११. कामगारांना देण्यात येणार्या सोयींचे अध्ययन करणे.

१२. कामगारांच्या समस्याचे अध्ययन करणे.

**उपकल्पना / गृहीतकृत्ये :–**

संशोधनासाठी घेण्यात आलेल्या संशोधन समस्येची किंवा संशोधनातील प्रश्नाची संभाव्य उत्तरे म्हणजे गृहीतकृत्ये होय. जी संशोधनाच्या स्वरुपात पूर्वी मांडण्यात येतात व ज्यांचा पडताळा संशोधन झाल्यानंतर करण्यात येते. या अनुषंगाने

सर्वेक्षणाकरिता काही गृहीतकृत्ये मांडण्यात आली आहे. ती खालीलप्रमाणे आहे

१. मिरची खुडणी व्यवसायामुळे मजुरांचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावलेला आहे.

२. मिरची खुडणी व्यवसायात काम करणा–या मजुरांना अतिशय कमी मजुरी दिली जाते.

३. मजुरांना कोणत्याही सोयी आणि सवलती दिल्या जात नाही.

४. काम करण्याचे ठिकाण आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक आहे.

**अध्ययनाचे क्षेत्र :–**

बी. ए. सिक्स सेमिस्टर च्या विद्यार्थ्यांकडून सर्वेक्षण अहवालांकरिता पवनी क्षेत्रातील मिरची खुडणी व्यवसायाची निवड करण्यात आली.

**अध्ययनाचे विश्व :–**

विश्व किंवा समग्र हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. सर्वसाधारण आपण निवडलेलया अध्ययन क्षेत्रात आपलया सर्वेक्षणासाठी ज्या व्यक्ती किंवा घटक उपयुक्त आहेत अशा सर्वांना अध्ययन विश्व म्हणतात.

प्रस्तुत अध्ययनाकरिता पवनी येथील मिरची खुडणी व्यवसायाचे अध्ययन विश्व आहे.

**नमुना निवड :–**

आर्थिक व सामाजिक तथ्य गोळा करण्यासाठी त्या समाजाच्या अथवा समुहाच सर्व सदस्यांची किंवा एकमेकांशी संपर्क साधने व त्यांच्याकडून तथ्य संपादन करणे शक्य होत नाही. म्हणून ही पद्धत स्वीकारली जाते.

**गुडे आणि हॉट :–**

‘‘विशिष्ट समुहातील प्रतिनीधी निवडुन त्यांच्या कडून माहिती मिळवने व ती माहिती संपूर्ण समूहाशी निगडीत आहे असे मानने या पद्धतीला नमुना निवड असे म्हणतात. नमुना नावाप्रमाणे एक विस्तृत समुहाचा लघु प्रतिनिधी आहे.

**नमुना निवडीचे दोन प्रकार –**

१) संभाव्यता नमुना निवड पद्धती २) गैर संभाव्यता नमुना निवड पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये संभाव्यता नमुना प्रकारातील साधा यादृश्चिक नमुना पद्धतीतील लॉटरी तंत्राचा वापर करून तथ्य संकलीत करण्यात येईल. वरीलपैकी विद्यार्थ्यांनी संभाव्यता नमुना निवड पद्धतीमधील सांधा यादृच्छिक नमुना निवडी पद्धत उपयोगात आणली आहे. यात पक्षपात होण्याचा संभव नसतो. तसेच लॉटरी पद्धतीत संपूर्ण एककाचा नमुन्यात निवडुन येण्याची समान संधी असते.

**संशोधन आराखडा:–**

कोणतेही कार्य करण्यापूर्वी त्याचा निश्चित आराखडा तयार करावा लागतो जेणेकरून कामात सुसूटितपणा व व्यवस्थितपणा येतो.

१) संशोधन आराखडयाचे प्रकार :– अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा

- वर्णनात्मक
- प्रायोगिक
- निदानात्मक

वरील आराखडयाकरिता विद्यार्थ्यांकडून वर्णनात्मक आराखडयाचा उपयोग करण्यात येईल.

**तथ्य संकलन पद्धती :–**

प्रस्तुत सर्वेक्षण अहवालामध्ये प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीचा म्हणजेच त्यात निरीक्षण, मुलाखत प्रश्नावली अनुसूचीचा वापर करण्यात येईल. तसेच दुय्यम पद्धती म्हणजेच प्रकाशित, अप्रकाशित, अहवाल, दैनंदिनी इ. समावेश केला असेल.

**तथ्य प्रक्रियाकरण :–**

संकलीत केलेली माहीती अपरिपक्व असल्याने त्यांना परिपक्वता आणण्यासाठी तथ्यांचे विश्लेषण करून संशोधनाची योग्य मांडणी करण्याची प्रक्रिया म्हणजे तथ्य प्रक्रियन.

**तथ्य वर्गीकरण :–**

तथ्य संकलन झाल्यानंतर सर्व मुलाखत अनुसूची एकत्रित आल्यानंतर विखुरलेल्या तथ्यांच्या आधारे विश्लेषण शक्य होणार नाही म्हणून विस्कळीत तथ्य एकत्रित करून त्याचे वर्ग पाडून क्रमवार लावण्यात येईल.

**संकेतीकरण :—**

वर्गीकरण व माहितीलाला व तथ्यांना योग्य संकेतन क्रमांक देण्यात येईल.

**मास्टर चार्ट**

सर्वेक्षण अहवाल सादर करण्याकरिता मास्टर चार्ट अतिशय आवश्यक घटक आहे. विस्कळीत माहीतीला आकडेवारीच्या रुपाने एकत्रित करण्यासाठी उपयोग करण्यात आले व मास्टर चार्ट वरून सारण्या तयार करण्यात येईल.

**सारणीकरण:**

मास्टरचार्ट वरून मिळालेल्या आकडेवारीच्या आधार प्रत्येक प्रश्नमार्ग एक याप्रमाणे सारख्या तयार करण्यात येईल व त्यावरून विश्लेषण व निष्कर्ष काढण्यात येईल

**विश्लेषण आणि निर्वाचन:—**

सारणीमध्ये दिलेल्या माहीतीच्या आधारे प्रतिशत यांच्या आधारावर विश्लेषण व स्पष्टीकरण करून त्यावर निष्कर्ष काढण्यात येईल.

**निष्कर्ष व सूचना शिफारशी:**

प्रस्तुत सर्वेक्षणात जाणीव जागृतीच्या संदर्भात काही निष्कर्ष, सुचना व शिफारशी देण्यात आले.

**गृहीतकृत्यांची पडताळणी :—**

प्रस्तुत अध्ययनात मांडलेल्या गृहीतकृत्यांचा पडताळा करण्यात येईल.

**संशोधनाचा कालावधी :—**

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण हे फक्त ३० उत्तरदात्यांकडून करण्यात येईल संशोधन करताना संशोधनाची मर्यादा पैसा श्रम वेळेची बचत उद्देश ठेवून सर्वेक्षण करण्यात येत संशोधन करतांना विद्यार्थ्यांना दोन दिवसाचा कालावधी देण्यात येईल.

**संशोधन अहवाल —**

प्रस्तुत अध्ययनात संशोधन कार्याचे विवरण एक क्रमबद्ध रितीने लिखित स्वरूपात प्रस्तुत केले जाईल.

**प्रकरण तिसरे**

**तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन**

संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन या प्रकरणात उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीवरून

विश्लेषण व निर्वचन करण्यात आलेले आहे. मुलाखतीच्या माध्यमातून मुलाखतदात्यांना प्रश्न विचारून तथ्ये संकलित करण्यात आले आहेत. त्या तथ्यांचे सांकेतीकरण करून मास्टरचार्ट तयार करण्यात आले. मास्टरचापार्टच्या सहाय्याने तथ्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

पवनी येथील मिरची खुडणी व्यवसायात काम करणा—या मजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यासाचे सर्वेक्षण करतांना मजुरांची वैयक्तिक व कौटुंबिक माहिती तसेच मजुरांच्या आर्थिक, सामाजिक स्थितीचे अध्ययन तसेच सोयी सुविधा बाबतची माहिती उत्तरदात्यांकडून विचारण्यात आली. व त्यानुसार तथ्ये गोळा करून त्यांचे सारणीकरण करून त्यांचे विश्लेषण व विवरण करण्यात आले आहे.

**प्रकरण तिसरे**

विश्लेषण आणि निर्वचन

उत्तरदात्यांची वैयक्तिक व कौटुंबिक माहिती

**सारणी क्रमांक— १.**

**उत्तरदात्यांचे वय दर्शविणारी सारणी**

उत्तरदात्यांच्या वयोमर्यादेमुळे त्यांच्यातील काम करण्याची परिपक्ता व  निर्णय घेण्याची क्षमता इत्यादी बाबींची  माहिती मिळते

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २० ते २५ | ०२ | ०६.६६ |
| २ | २६ ते ३० | ०३ | १०.०० |
| ३ | ३१ ते ३५ | ०४ | १३.३३ |
| ४ | ३६ पेक्षा जास्त | २१ | ७०.०० |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते कि.२० से २५ वयोगटातील उत्तरदाते ०२ असून त्यांचे का प्रमाण ०६.६६ आहे. तर २६ ते ३० वर्ष वयोगटातील उत्तरदाते ०३ असून त्यांचे शेकडा

प्रमाण १०.०० आहेर ३१ ते ३५ वर्ष वयोगटातील उत्तरदात्यांचे प्रमाण ०४ असून त्यांचे शेकडा प्रमाण १३.३३ आहे. तर ३६ पेक्षा जास्त उत्तरदात्यांचे प्रमाण २१ असून त्याचे शेकडा प्रमाण ७०.०० आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, ३६ वर्ष पेक्षा जास्त वयोगट असणान्या उत्तरदात्याची संख्या ही इतर वयोगट असणान्या उत्तरदात्यांपेक्षा जास्त आहे.

सारणी २

उत्तरदात्यांची लिंग दर्शवणारी सारणी लिंगदर्शक सारणी हो पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्त्री | १८ | ६०.०० |
| २ | पुरूष | १२ | ४०.०० |
| ३ | — | — | — |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की स्त्रीलिंगी असणारे उत्तरदाते हे १८ असून त्यांचे शेकडा प्रमाण ६०.०० आहे. पुरुष लिंगी उत्तरदाते १२ असून त्यांचे शेकडा प्रमाण ४०.०० आहे. पावरून स्पष्ट होते की स्त्रीयांचे प्रमाण जास्त असून पुरुषांचे प्रमाण कमी आहे.

सारणी क्र. ३

उत्तरदात्यांचे धर्म दर्शवणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | १५ | ५०.०० |
| २ | बौध्द | १३ | ४३.३३ |
| ३ | मुस्लीम | ०२ | ०६.६६ |
| | एकुण | ३० | १००.०० |

जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती ही धर्माशी निगडित असते व धर्मावरून सामाजिक व वैचारिक बाबींचे अध्ययन करता येते.

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की एकूण ३० उत्तरदात्यांपैकी हिंदू धर्माचे उत्तरदाते हे १५ असून त्यांचे शेकडे शेकडा प्रमाण ५०.०० आहे. बौद्ध धर्माचे उत्तरदाते १३ असून त्यांचे शेकडा प्रमाण ४३.३३ आहे. तर मुस्लिम धर्माचे उत्तर दाते ०२ असून त्यांचे शेकडा प्रमाण

०६.६६ आहे. यावरून असे स्पष्ट होते की हिंदू धर्म असणा—या उत्तरदात्यांची संख्या बौद्ध व मुस्लीम धर्मापेक्षा जास्त आहे.

**सारणी क्र.४**

**उत्तरदात्यांचे शिक्षण दर्शवणारी सारणी**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक | १० | ३३.३३ |
| २ | माध्यमिक | १८ | ६०.०० |
| ३ | निरक्षर | ०२ | ०६.६६ |
| | एकुण | ३० | १००.०० |

मानवी जीवनात शिक्षणाला फार महत्त्व आहे. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाला चालना मिळते व्यक्तीचे शिक्षण त्यांच्या विचारात व मनाला परिवर्तन करण्यास सहाय्य ठरते.

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की एकूण ३० उत्तरदात्यांपैकी प्राथमिक स्तराचे उत्तरदाते १० असून शेकडा प्रमाण ३३.३३ तर माध्यमिक १८ असून त्यांच्या शेकडे प्रमाण ६० तर निरक्षर ०२ असून त्याचे शेकडा प्रमाण ०६.६६ आहे. पावरून असे स्पष्ट होते की माध्यमिक व उच्च माध्यमिक असणा—या उत्तर दात्यांची संख्या जास्त आहे. तर प्राथमिक शिक्षण घेण्याची संख्या आणि निरक्षरांची संख्या कमी प्रमाणात आढळून आली.

**सारणी क्र.५**

**उत्तरदात्यांची जातीची वर्गवारी दर्शवणारी सारणी**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | ०८ | २६.६६ |
| २ | अनु. जमाती | ०३ | १०.०० |
| ३ | ओबीसी | १७ | ५६.०० |
| ४ | एन.टी | ०२ | ०६.६६ |
| | एकुण | ३० | १००.०० |

उत्तरदात्यांचा जातीची वर्गवारी दर्शविण्यासाठी पुढील सारणी तयार करण्यात आली.

वरील सारणी वरून असे निदर्शनाचे येते की ३० उत्तरदात्यांपैकी अनुसूचित जाती उत्तरदात्यांची संख्या ०८ असून त्यांचे शेकडा प्रमाण २६.६६ आहे. तर अनुसूचित जमाती ची संख्या ०३ असून त्यांचे शेकडा प्रमाण १०.०० आहे तर इतर (ओबीसी) चे उत्तरदाते १७ असून त्याचे

शेकडा प्रमाण ५६.६६ आहे. तर एनटी चे प्रमाण ०२ असून त्याचे शेकडा प्रमाण ०६.६६ आहे.

यावरून असे स्पष्ट होते की अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व एन.टी यांचे जातीपेक्षा इतर (ओबीसी) जातीच्या उत्तरदात्यांची संख्या ही सर्वात जास्त आहे.

**सारणी क्रमांक ६**

**उत्तरदात्यांची वैवाहिक दर्जा दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विवाहीत | २४ | ८०.०० |
| २ | टविवाहीत | ०४ | १३.३३ |
| ३ | विधवा | ०२ | ०६.६६ |
| | एकुण | ३० | १००.०० |

उत्तरदात्यांचा वैवाहिक दर्जा दर्शवण्यासाठी पुढील सारणी तयार करण्यात आली. वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की एकूण ३० उत्तरदात्यापैकी विवाहित उत्तरदात्यांची संख्या २४ असून त्यांचे शेकडा प्रमाण ८०.०० आहे. तर अविवाहित उत्तरदात्यांची संख्या ०४ असून त्यांचे शेकडा प्रमाण १३.३३ आहे. तर विधवा उत्तरदात्यांची संख्या ०२ असून त्यांचे शेकडा प्रमाण ०६.६६ आहे.

यावरून असे स्पष्ट होते की विवाहित उत्तरदात्यांची संख्या ही अविवाहित व इतर उत्तर दात्यापेक्षा जास्तआहे.

**सारणी क्रमांक ७**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबाचा प्रकार दर्शवणारी सारणी**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सयुक्त कुटुंब | १४ | ४६.६६ |
| २ | विभक्त कुटूंब | १६ | ५३.३३ |
| ३ | — | — | — |
| | एकुण | ३० | १००.०० |

भारतीय संस्कृतीमध्ये कुटुंबाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. उत्तरदात्याच्या कुटुंबाच्या स्वरूपावरून एकंदर मजुरांच्या स्थितीविषयी माहिती लक्षात येते. बरेच उत्तरदाते ही हंगामी काळात

कुटुंबापासून दूर राहतात अथवा विभक्त कुटुंबात राहतात व त्यामुळे संयुक्त व विभक्त कुटुंबाचे प्रमाण लक्षात घेतले आहे. ते पुढील सारणीवरून स्पष्ट होते.

वरील सारणी वरून असे लक्षात येते की एकूण उत्तरदात्यापैकी १४ उत्तरदाते ही संयुक्त कुटुंब गटातील असून त्यांचे शेकडा प्रमाण ४६.६६ आहे व १६ उत्तरदाते हे विभक्त कुटुंबातील आहेत व त्याचे शेकडा प्रमाण ५३.३३ आहे. म्हणजेच जास्तीत जास्त उत्तरदाते हे विभक्त कुटुंबातील आहेत.

**सारणी क्रमांक ८**

**उत्तरदात्यांच्या व्यवसायाचे स्वरूप दर्शवणारी सारणी**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हंगामी स्वरूप | ३० | १००.०० |
| | एकुण | ३० | १००.०० |

उत्तरदाते ज्या व्यवसायामध्ये काम करतात तो व्यवसाय कोणत्या स्वरुपाचा आहे हे त्या व्यवसायाच्या स्वरूपावरून त्यांची आर्थिक व सामाजिक स्थितीचे ज्ञान होते.

व्यवसायाचे स्वरूप दर्शवणारी सारणी पुढीलप्रमाणे आहे.

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की सर्वच उत्तरदाते ही हंगामी स्वरुपाचे काम करणारे आहेत व त्यांना फक्त हंगामाच्या काळातच व्यवसायात काम दिले जाते स्थायी व अस्थायी स्वरुपाचे काम करणारे मजूर नाहीत.

**सारणी क्र.९**

**उत्तरदात्यांची मासिक उत्पन्न दर्शवणारी सारणी**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ४०००—५००० | १२ | ४०.०० |
| २ | ६०००—९००० | ०३ | १०.०० |
| ३ | १०००० चे वर | १५ | ५०.०० |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणी वरुन लक्षात येते की ३० उत्तरदात्यांपैकी १२ उत्तरदाते हैं ४०.०० ते ५००० रुपये उत्पन्न गटातील असून त्यांचे शेकडा प्रमाण ४०.०० आहे. तर ०३ उत्तरदाते आहे ६००० ते ९००० चे मासिक उत्पन्न गटात मोडत असून त्यांचे शेकडा प्रमाण १०.०० आहे. तर दहा

हजार रुपयाचे वर उत्पन्न गटातील १५ उत्तरदाते असून त्याचे शेकडा प्रमाण ५०.०० आहे. म्हणजेच जास्तीत जास्त उत्तरदाते हे १०,००० उत्पन्न गटातील असून ४००० ते ९००० उत्पन्न गटातील उत्तरदात्यांचे प्रमाण कमी आहे.

## आर्थिक माहिती

उत्तरदात्यांची आर्थिक माहिती घेण्यामागील उद्देश म्हणजे उत्तरदात्याचा आर्थिक दर्जा कसा आहे त्याची उत्पन्नाची इतर साधने कोणती आहेत व एकूण आर्थिक स्थिती कशी आहे यासंबंधी माहिती घेण्यासाठी व एकूण उत्तरदात्यांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यासाठी या माहितीचा उपयोग होतो. उत्तरदात्यांचा आर्थिक दर्जा हा चांगला असेल तर त्याचे कौटुंबिक जीवन समाधानी राहील व त्यांच्या सर्व गरजा पूर्ण होत असतील तर त्यांच्यामध्ये कोणताही तणाव दिसून येणार नाही व त्यामुळे सलोख्याचे संबंध, व्यवसायाचे समायोजन प्रस्थापित केले जाईल. उत्पन्न कमी असेल अथवा मासिक वेतन त्यांच्या गरजा पूर्ण करणार्या नसतील तर अनेक समस्या कौटुंबिक संघर्ष, ताण तणाव व व्यक्तींव्यक्तीमध्ये असमतोल दिसून येईल व त्याची असमाधानी वृत्ती दिसून येईल. तसेच उत्पादन कार्यक्षमता व संबंध यावरही त्याचा परिणाम होईल. व त्याचा कामगारांच्या वैयक्तिक जीवनावर सुद्धा परिणाम होईल. आर्थिक दृष्टया ही हंगामी मजुरांच्या दृष्टीने एक आवश्यक बाब आहे.

आर्थिक माहिती या घटकाखाली उत्पन्नाची इतर साधने एकूण मासिक उत्पन्न त्यांच्या समावेश करण्यात आला आहे.

**सारणी क्र. ११**

**उत्तरदात्यांचा आर्थिक दर्जा दर्शवणारी सारणी**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दारिद्रयरेषेखालील | १८ | ६०.०० |
| २ | दारिद्रयरेषेवरील | १२ | ४०.०० |
| | एकुण | ३० | १००.०० |

उत्तरदात्यांचा आर्थिक दर्जादर्शविण्यासाठी पुढील सारणी तयार करण्यात आली.

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की एकूण ३० उत्तरदात्यापैकी दारिद्रयरेषेखालील उत्तरदात्यांची संख्या १८ असून त्यांचे शेकडा प्रमाण ६०.०० आहे तर दारिद्रयरेषेवरील उत्तरदात्यांची संख्या १२ असून त्यांचे शेकडा प्रमाण ४०.०० आहे. यावरुन असे स्पष्ट होते की दारिद्रयरेषेखालील उत्तरदात्यांची संख्या ही दारिद्रयरेषेवरील उत्तरदात्यांच्या संख्येपेक्षा जास्त आहे.

सारणी क्रमांक १२

उत्तरदात्यांची राहणीमान दर्शवणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मध्यम | १२ | ४०.०० |
| २ | कनिष्ठ | १८ | ६०.०० |
| | एकुण | ३० | १००.०० |

उत्तरदात्याचे राहणीमान दर्शवण्यासाठी पुढील सारणी तयार करण्यात आली आहे.

वरील सारणी वरुन असे निदर्शनास येते की एकूण ३० उत्तरदात्यापैकी मध्यम राहणीमान असणारे उत्तरदाते १२ असून त्याचे शेकडा प्रमाण ४०.०० आहे. तर कनिष्ठ राहणीमान असणारे उत्तरदाते १८ असून त्याचे शेकडा प्रमाण ६०.०० आहे. पावरुन असे स्पष्ट होते की कनिष्ठ राहणीमान असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ही मध्यम उत्पन्न असणा—या उत्तरदात्याच्या संख्येपेक्षा जास्त आहे.

सारणी क्रमांक १३

उत्तरदात्यांची उत्पन्नाची इतर साधने दर्शवणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नाही | २८ | ९३.३३ |
| २ | शेती | ०२ | ०६.६६ |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की एकूण उत्तरदात्यापैकी उत्पन्नाची इतर साधने नाही म्हणणारी उत्तरदात्यांची संख्या २८ असून त्याचे शेकडा प्रमाण ९३.३३ आहे. तर शेती व्यवसाय करणारी उत्तरदात्यांची संख्या ०२ असून त्याचे शेकडा प्रमाण ०६.६६ आहे. यावरून असे स्पष्ट होते की उत्पन्नाची साधने नसणारी सर्वात जास्त उत्तरदात्यांची संख्या आहे

सारणी क्रमांक १४

उत्तरदात्यांच्या निवासस्थानापासून असणारे कामाचे अंतर

| अ.क्र | विवरण | वरंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ किलो मीटर | १६ | ५३.३३ |
| २ | २ किलो मीटर | ०८ | २६.०६ |
| ३ | ३ किलो मीटर | ०६ | २०.०० |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणी वरुन असे लक्षात येते की एकूण उत्तरदात्यांपैकी १६ उत्तरदात्यांचे हे १ किलोमीटर अंतरावर राहत असून त्यांचे शेकडा प्रमाण ५३.३३ आहे आहे तर ०८ उत्तरदाते हे दोन किलोमीटर अंतरावर राहत असून त्यांचे शेकडा प्रमाण २६.६६ आहे. तर ०६ उत्तरदाते हे तीन किलोमीटर अंतरावर राहतात व त्याचे शेकडा प्रमाण २०.०० आहे. म्हणजे जास्तीत जास्त उत्तरदाते हे एक किलोमीटर अंतरावर राहतात व यामुळे त्यांना प्रवासाचा आर्थिक भ्रुंदड सहन करावा लागत नाही.

सारणी क्रमांक १५

उत्तरदात्यांच्या कामाचे तास दर्शवणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वरंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ७ ते ९ तास | २३ | ७६.६६ |
| २ | १० तासापेक्षा जास्त | ०७ | २३.३३ |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की एकूण ३० उत्तरदात्यापैकी २३ उत्तरदाते सात ते नऊ तास काम करतात. त्याचे शेकडा प्रमाण ७६.६६ आहे. तर ०७ उत्तरदाते हे दहा तासापेक्षा जास्त काम करतात. त्याचे शेकडा प्रमाण २३.३३ इतके आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की ७ ते ९ तास काम करणाऱ्यांची संख्या सर्वात जास्त असून १० तासापेक्षा जास्त काम करणार्यांची संख्या कमी आहे.

सारणी क्रमांक १६

कुटुंबातील या व्यवसायात काम करणा—या सदस्यांची संख्या दर्शवणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ ते २ सदस्य | १२ | ४०.०० |
| २ | २ ते ३ सदस्य | १८ | ६०.०० |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणी वरुन असे निदर्शनास येते की ३० उत्तरदात्यापैकी १ ते २ सदस्य संख्या असलेल्या कुटुंबांची संख्या ही १२ असून त्याचे शेकडा प्रमाण ४०: आहे तर २ ते ३ सदस्य या व्यवसायात काम करणारे कुटुंबांची संख्या ही १८ असून त्याचे शेकडा प्रमाण ६० टक्के आहे. यावरून असे स्पष्ट होते की एका कुटुंबातील २ ते ३ सदस्य या व्यवसायात काम करणार्यांची संख्या सर्वात जास्त असून १ ते २ या गटातील सदस्य संख्या सर्वात कमी आहे.

सारणी क्रमांक १७

कामाच्या ठिकाणी असणा—या सोयी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पिण्याच्या पाण्याची सोय | ०२ | ०६.६६ |
| २ | स्वच्छतागृह नाही | २८ | ९३.३३ |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की एकूण ३० उत्तरदात्यापैकी पिण्याच्या पाण्याची सोय आहे म्हणणारे ०२ उत्तरदाते असून त्याचे शेकडा प्रमाण ०६.६६ आहे. तर स्वच्छतागृह सोय नाही असे म्हणणार्यांची संख्या २८ असून त्याचे शेकडा प्रमाण ९३.३३ इतके आहे. यावरून असे स्पष्ट होते की कामाच्या ठिकाणी कोणत्याही सोयी उपलब्ध नाहीत.

सारणी क्रमांक १८

कामाच्या ठिकाणी येणान्या अडचणी दर्शवणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अडचणी आहेत | | |
| २ | अडचणी नाहीत | | |
| ३ | | | |
| | एकुण | | |

वरील सारणी वरून असे निदर्शनात येते की ३० उत्तरदात्यांपैकी कामाच्या ठिकाणी वैद्यकीप सोयी नाहीत असे म्हणणा—या उत्तरदात्यांची संख्या ०६ असून त्याचे शेकडा प्रमाण २० आहे. तर इतर येणा—या अडचणी म्हणणारे २४ उत्तरदाते असून त्याचे शेकडा प्रमाण ८० आहे. यावरुन असे स्पष्ट होते की कामाचे अंतर आणि वैद्यकीय सोयींची अडचण आहे म्हणणारे उत्तर दाते कमी असून कोणत्याही सोयी त्या ठिकाणी उपलब्ध नाहीत म्हणणार्या उत्तरदात्यांची संख्या सर्वांत जास्त आहे.

**सारणी क्रमांक २२**

**उत्तरदात्यांचा यापूर्वीचा व्यवसाय दर्शवणारी सारणी**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेती व्यवसाय | १६ | ५३.३३ |
| २ | मजूरी व्यवसाय | १२ | ४०.०० |
| ३ | इतर व्यवसाय | ०२ | ०६.६६ |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की ३० उत्तरदात्यांपैकी शेती व्यवसाय करणारे १६ उत्तरदाते असून त्याचे शेकडा प्रमाण ५३.३३ आहे. तर मजुरी व्यवसाय करणारे उत्तरदाते १२ असून त्याचे शेकडा प्रमाण ४०.०० आहे. इतर व्यवसाय करणारे ०२ असून त्याचे शेकडा प्रमाण ०६.६६ आहे. यावरून असे स्पष्ट होते की शेती करणार्या मजुरांची संख्या सर्वात जास्त असून मजुरी व इतर काम करणा—या उत्तरदात्यांची संख्या कमी आहे.

**सारणी क्रमांक २३**

**मिरची खुडणी कामाचा अनुभव दर्शवणारी सारणी**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ ते २ वर्ष | १० | ३३.३३ |
| २ | ३ ते ५ वर्ष | ०७ | २३.३३ |
| ३ | ५ ते १० वर्ष | १२ | ४३.३३ |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की एकूण ३० उत्तरदात्यांपैकी १ ते २ वर्ष अनुभव असणार्या उत्तरदात्यांची संख्या १० असून त्याचे शेकडा प्रमाण ३३.३३ आहे तर तीन ते पाच वर्षांचा अनुभव असणार्या उत्तरदात्यांची संख्या ०७ असून त्याचे शेकडा प्रमाण २३.३३ आहे.

तर पाच ते दहा वर्षे अनुभव असणा–या उत्तरदात्यांची संख्या १२ असून त्याचे शेकडा प्रमाण ४३.३३ आहे.

यावरून असे स्पष्ट होते की या व्यवसायात सर्वात जास्त अनुभव ५ ते १० वर्षे असलेल्या उत्तरदात्यांची संख्या सर्वात जास्त असून १ ते ५ वर्षे अनुभव असलेल्या उत्तरदात्यांची संख्या कमी आहे.

**सारणी क्रमांक २४**

**इच्छेनुसार काम दर्शवणारी सारणी**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | इच्छेनुसार काम दिले जाते | ३० | १००.०० |
| २ | नाही | ०० | ०० |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणी वरुन असे निदर्शनास येते की २९ उत्तरदात्यांपैकी इच्छानुसार काम दिले जाते होय म्हणणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ३० असून त्याचे शेकडा प्रमाण १००.०० आहे. नाही म्हणणारे उत्तर दाते ० आहेत.

यावरून असे स्पष्ट होते की सर्वच उत्तरदात्यांना त्यांच्या इच्छेनुसार काम दिले जाते.

**सारणी क्रमांक २६**

**उतरदात्यांना नियमित काम मिळते काम दर्शवणारी सारणी**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३० | १००.०० |
| २ | नाही | ०० | ०० |
| ३ | | | |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की ३० उत्तरदात्यांपैकी नियमित काम मिळते होय म्हणणा–याचा उत्तरदात्यांची संख्या ३० असून त्याचे शेकडा प्रमाण १०० आहे. नाही म्हणणारे उत्तरदाते ० आहेत.

यावरून असे स्पष्ट होते की सर्वच उत्तरदात्यांना नियमित काम मिळत असते..

सारणी क्रमांक २७

कामाच्या ठिकाणी मिळणा–या मजुरीचे स्वरूप दर्शवणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दैनिक मजुरी | ०० | ०० |
| २ | साप्ताहीक | ३० | १००.०० |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की ३० उत्तरदात्यांपैकी दैनिक मजुरी मिळते म्हणणारे उत्तरदाते ० आहे तर साप्ताहिक मजुरी मिळते म्हणणारे उत्तरदाते ३० असून त्याचे शेकडा प्रमाण १०० आहे. मासिक मजुरी मिळते म्हणणारे उत्तरदाते ० आहेत.

यावरून असे स्पष्ट होते की साप्ताहिक मजुरी मिळते असे म्हणणार्या उत्तरदात्यांची संख्या १००% असून दैनिक व मासिक मजुरी मिळते म्हणणारे उत्तर दाते नाहीत.

सारणी क्रमांक ३२

उत्तरदात्यांचे व्यवस्थापन (मॅनेजर ठेकेदार सुपरवायझर) यांच्याशी असणारे संबंध दर्शवणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चंगले | ३० | १००.०० |
| २ | वाईट | ०० | ०० |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की एकूण ३० उत्तरदात्यांपैकी मॅनेजर ठेकेदार व सुपरवायझर यांच्यासोबत चांगले स्वरूपाचे संबंध प्रस्थापित आहेत असे म्हणणारे उत्तरदाते ३० असून त्याचे शेकडा प्रमाण १००.०० आहे. तर वाईट संबंध म्हणणारे ० आहेत.

यावरून असे स्पष्ट होते की सर्व उत्तरदात्यांचे व्यवस्थापनाशी चांगले संबंध आहे.

सारणी क्रमांक ३३

कामाच्या ठिकाणी उत्तरदात्यांच्या स्वास्थ्यासंबंधी तक्रारी दर्शवणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | खोकला | २० | ६६.६६ |
| २ | हातांची आग | ०८ | २६.६६ |
| ३ | डोळयावर तान आणि चिडचिड | ०२ | ०३.३३ |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की ३० उत्तरदात्यांपैकी खोकला येते म्हणणारे उत्तरदाते २० असून त्याचे शेकडा प्रमाण ६६.६६ आहे तर हातांची आग होते म्हणणारे ०८ उत्तरदाते असून त्याचे शेकडा प्रमाण २६.६६ आहे तर डोळ्यावर ताण आणि चिडचिड होते म्हणणा—यां उत्तरदात्यांची संख्या अनुक्रमे ०१असून त्याचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ०३.३३ आहे.

यावरून असे स्पष्ट होते की खोकला येतो म्हणणारे सर्वात जास्त उत्तरदाते असून हाताची आग होणे चिडचिड व डोळ्यावर ताण येणे म्हणणारे उत्तर दाते कमी आहेत.

सारणी क्रमांक ३४

प्रतिव्यक्ती दररोज किती किलो मीरची खुडणी केली जाते दर्शवणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १० ते १५ किलो | ०९ | ३०.०० |
| २ | १६ ते २० किलो | २१ | ७०.०० |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की ३० उत्तरदात्यांपैकी १० ते १५ किलो मिरची खुडणी करणारे उत्तरदात्यांची संख्या ०९ असून त्याचे शेकडा प्रमाण ३० आहे. तर १६ ते २० किलो मिरची खुडणी करणारे उत्तर दाते २१ असून त्याचे शेकडा प्रमाण ७०.०० आहे.

यावरून असे स्पष्ट होते की १६ ते २० केजी मिरची खुडणी करणारे उत्तरदाते सर्वात जास्त असून दहा ते पंधरा केजी मिरची खुडणी करणारे उत्तरदाते कमी आहे.

सारणी क्रमांक ३८

उत्तरदात्यांची आर्थिक स्थिती सुधारली किंवा नाही दर्शवणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आर्थिक स्थिती सुधारली | २१ | ७०.०० |
| २ | स्थिती सुधारली नाही | ०९ | ३०.०० |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की ३० उत्तरदात्यांपैकी आर्थिक स्थिती सुधारली म्हणणारे उत्तरदाते २१ असून त्याचे शेकडा प्रमाण ७०.०० आहे. तर आर्थिक स्थिती सुधारली नाही म्हणणारे उत्तरदाते ०९ असून त्याचे शेकडा प्रमाण ३०.०० आहे.

यावरून असे स्पष्ट होते की या कामामुळे आर्थिक स्थिती सुधारली होय म्हणणा—या उत्तरदात्यांची संख्या सर्वात जास्त असून आर्थिक सथिती सुधारली नाही म्हणण—या उत्तर दात्यांची संख्या कमी आहे.

सारणी क्रमांक ३९

कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्या वस्तूचा पुरवठा केला जातो दर्शवणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कोणत्याही साहित्याचा पुरवठा होत नाही | ३० | १००.०० |
| | एकुण | ३० | १००.०० |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की ३० उत्तरदात्यांपैकी अप्रन, हातमोजे, मास्क आणि इतर कोणतीही वस्तू सुरक्षिततेच्या दृष्टीने पुरवठा केली जात नाही म्हणणा—या उत्तरदात्यांची संख्या ३० असून त्याचे शेकडा प्रमाण १०००० आहे. यावरून असे स्पष्ट होते की कामाच्या ठिकाणी कोणत्याही वस्तू उत्तरदात्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने

## प्रकरण चौथे

### सर्वसामान्य निष्कर्ष व सूचना

अभ्यास मुलाखत अनुसूचित द्वारे करण्यात आला त्यांचे आधारे निघणारे निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. जास्तीत जास्त उत्तरदाते ३६ वर्षे पेक्षा जास्त वयोगटातील आहेत.
२ बहुसंख्य उत्तर जाते हे स्त्री गटातील आहे.
३. बहुसंख्य उत्तरदाते हे हिंदू धर्मातील आहे.
४. जास्तीत जास्त उत्तरदाते हे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे.
५ बहुसंख्य उत्तरदाते हे ओबीसी गटातील आहे.
६. बहुसंख्य उत्तरदाते हे विवाहित आहेत.
७. बहुसंख्य उत्तरदाते हे विभक्त कुटुंबातील आहेत.
८. सर्वच उत्तरदात्यांचे काम हे हंगामी स्वरुपाची आहे.
९. जास्तीज जास्त उत्तरदात्यांचे मासिक उत्पन्न १०००० रूपये चे वर आहे.
१०. दारिद्रय रेषेवरील उत्तरदात्यांची संख्या सर्वात जास्त आहे.
११. कनिष्ठ राहणीमान असणा—या उत्तरदात्यांची संख्या जास्त आहे.
१२. जास्तीत जास्त उत्तरदात्यांकडे उत्पन्नाची इतर कोणतेही साधने नाहीत.
१३. बहुसंख्य उत्तरदाते हे एक किलोमीटर अंतरावर राहतात.
१४. जास्तीत जास्त उत्तरदाते हे ७ ते ९ तास काम करतात.
१५. जास्तीत जास्त उत्तरदात्यांच्या कुटुंबातील दोन ते तीन सदस्य या व्यवसायात काम करतात.
१६. कामाच्या ठिकाणी कोणत्याही सोयी नाहीत.
१७. या व्यवसायात येण्यापूर्वी शेतमजूरी करणार्या उत्तरदात्यांची संख्या सर्वात जास्त आहे.
१८. या व्यवसायात सर्वात जास्त अनुभव पाच ते दहा वर्षे असलेल्या उत्तरदात्यांची संख्या जास्त आहे
१९. सर्वच उत्तरदात्यांना त्यांच्या इच्छेनुसार काम दिले जाते.
२०. सर्वच उत्तरदात्यांना नियमित काम मिळत असते.
२१. सर्वच उत्तरदात्यांना साप्ताहिक मजुरी मिळते.
२२. सर्वच उत्तरदात्यांचे व्यवस्थापनाशी चांगले संबंध आहेत.
२३. कामाच्या ठिकाणी कोणत्याही आरोग्याच्या सोपी उपलब्ध नाहीत.
२४. जास्तीत जास्त उत्तरदात्यांना खोकल्याची कंबर दुखी आणि हातांची आग होणे इत्यादी समस्या आहेत.
२५. सर्वात जास्त उत्तरदाते हे १६ ते २० किलो मिरची दररोज खुडतात.
२६ सर्वात जास्त उत्तरदाते आर्थिक सथिती सुधारली म्हणणारी आहेत.

२७. सर्वच उत्तरदात्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही वस्तूंचा पुरवठा केला जात नाही.

२८. जास्तीत जास्त उत्तरदात्यांच्या राहणीमानात सुधारणा होत आहे.

२९. उत्तरदात्यांना अतिरिक्त कामाचा योग्य मोबदला दिला जातो.

३० हंगामी काम असल्यामुळे जास्तीत जास्त उत्तरदात्यांना असुरक्षितता वाटते.

३१. जास्तीत जास्त उत्तरदात्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होताना दिसून येतो.

३२. मिळणारे वेतन अपुरे असल्याचे जास्तीत जास्त उत्तरदात्यांची म्हणणे आहे.

३३. काम करण्याच्या ठिकाणी उत्तरदात्यांना अनेक अडचणीं जाणवतात.

३४. जास्तीत जास्त उत्तरदात्यांना कामाचा ताण जाणवतो.

३५. कामाच्या ठिकाणी जास्तीत जास्त उत्तरदात्यांना सोयी मिळाव्यात असे वाटते.

**गृहीतके व त्यांचा पडताळा**

प्रस्तुत सर्वेक्षणाकरिता विद्यार्थ्यानी घेतलेल्या खालील गृहीत कृत्ये काही प्रमाणात सिद्ध झाले आहेत.

१. मिरची खुडणी व्यवसायामुळे मजुरांचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावलेला आहे. सारणी क्रमांक ९ व १३, ३८ वरून पडताळणी केली असता असे आढळून येते की या व्यवसायामुळे मजुरांच्या आर्थिक जीवनावर व सामाजिक जीवनावर अनुकूल असा परिणाम झालेला आहे. यावरुन ही उपकल्पना सत्य ठरते.

२. मिरची खुडणी व्यवसायात काम करणार्या मजुरांना अतिशय कमी मजुरी दिली जाते. सारणी क्रमांक २८ वरून पडताळणी केली असता असे आढळून येते की काम करणा—या मजुरांना ठेकेदारांकडून प्रति किलो कमी मजुरी देण्यात येते ही उपकल्पना सत्य ठरते.

३. मजुरांना कोणत्याही सोयी आणि सवलती दिल्या जात नाही.

सारणी क्रमांक १९ व ३१ वरुन पडताळणी केली असता असे आढळून येते की कामाच्या ठिकाणी मजुरांना कोणत्याही सोयी आणि सवलती दिल्या जात नाही यावरून ही उपकल्पना सत्य ठरते

४. काम करण्याचे ठिकाण आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक आहे. सारणी क्रमांक २० वरून पडताळणी केली असता असे आढळून येते की काम करण्याच्या ठिकाणची परिस्थिती आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत वाईट आहे. त्यामुळे ही उपकल्पना सत्य ठरते.

सूचना शिफारसी मजुरांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी काहीआवश्यक सूचना मिरची खुडणी व्यवसायात काम करणा—या मजुरांच्या आर्थिक विकास साधण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देणे तसेच त्यांना योग्य त्या सोयी सवलती जर दिल्या तर निश्चितच त्यांच्या जीवनामध्ये सुधारणा घडवून येतील आणि त्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढून त्यांचे राहणीमान उंचावण्यास अधिक मदत होईल. मजुरांच्या आर्थिक व सामाजिक अडचणी

सोडवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न खाजगी ठेकेदार किंवा व्यवस्थापन व मजूर यांच्या समन्वयाने समस्यांचे स्वरूप समजल्याशिवाय अशा कामांना महत्त्व राहत नाही अशा स्थितीत आर्थिक व सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी खालील प्रयत्न करणे आवश्यक आहे.

१. मजुरांना योग्य तो मोबदला देण्यात यावा.

२. हंगामी मजुरांना कामाची हमी मिळवून दयावी

३. हंगामी मजुरांना कायद्याची सुरक्षा संरक्षण मिळवून दयावी .

४. इतर स्थायी मजुरांप्रमाणे सोयी सवलती मिळवून देणे.

५ स्थायी रोजगार मिळवून दयावी.

६. व्यवसायातील ठेकेदार तसेच मजूर यांचे मध्ये सल्लागार समितीची स्थापना करून समन्वय प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

७. हंगामी मजुरांच्या समस्या सोडवण्यासाठी एक समन्वय समिती स्थापन करणे.

८. कामाच्या ठिकाणी प्रथमोपचार आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने पुरेशा सोयी उपलब्ध करून देणे.

९. पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध करून दयावी

१०. स्वच्छतागृह उपलब्ध करून दयावी

**परिशिष्ट**

मुलाखत अनुसूची :— जोडलेली आहे

# डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स पवनी.जि. भंडारा

अर्थशास्त्र विभाग

सत्र– २०२२–२३

बी. ए. ६ सेम

मुलाखत अनुसूची

पवनी येथील मिरची खुडणी व्यवसायात काम करणा–या मजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास

विशेष संदर्भ :– सामाजिक, आर्थिक सर्वेक्षण प्रश्नावली

विद्यार्थ्याचे नाव: – ____________________

I वैयक्तिक माहिती

१. उत्तरदात्याचे नाव :– ____________________

२. पत्ता :– ____________________

३. वय: – ____________________

४. लिंग: – ____________________

५. जात: – ____________________

६. धर्म : – ____________________

७. शिक्षण :– ____________________

८. व्यवसायाचे स्वरूप : स्थायी / अस्थायी / हंगामी

९. मासिक उत्पन्न: – ____________________

१०. वैवाहिक स्थिती: विवाहित /अविवाहित /इतर

११.कुटुंबाचे स्वरूप संयुक्त /विभक्त

II आर्थिक माहिती

१२. आर्थिक दर्जा : दारिद्ररेषेवरील /दारिद्र रेषेखालील

१३. राहणीमान : उच्च/ मध्यम / कनिष्ठ

१४. उत्पन्नाची इतर साधने आहेत काय? होय / नाही असल्यास कोणती ? ____________________

III कामाच्या ठिकाणची माहिती

१५. तुमचे राहण्याचे घर केंद्रापासून किती अंतरावर आहे? ____________________

१६.तुमचे काम किती वाजेपासून सुरू होते? ____________________

१७. किती तास काम करावे लागते? ____________________

१८. कुटुंबातील किती सदस्य येथे काम करतात? ____________________

१९. मिरची खुडणी केंद्रात कोणकोणत्या सोयी आहेत? विज /पाणीपुरवठा /स्वच्छतागृह /इतर

२०.हे काम तुम्हाला कसे वाटते? फार चांगले / चांगले / साधारण /वाईट / फार वाईट

२१.कामाच्या ठिकाणी कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते? कामाचे अंतर /वैद्यकीय सोयी / इतर

२२.यापूर्वी तुम्ही कोणता व्यवसाय करत होता? ______________________

२३. तुम्हाला या कामात किती वर्षांचा अनुभव आहे? ______________________

२४. तुम्हाला काम तुमच्या इच्छेनुसार दिले आहे काय? होय / नाही

२४.नसल्यास तुम्ही कोणत्या प्रकारचे काम करू इच्छिता? ______________________

२५. तुम्हाला काम नियमित मिळते काय? होय /नाही /अनिश्चित

२६. तुम्हाला मजुरी कशा स्वरूपात दिली जाते? दैनिक /साप्ताहिक /मासिक

२७. मजुरीचा दर कोणाकडून ठरविला जातो ? ______________________

२८. तुम्हाला योग्य काम मिळाले असे वाटते काय? होय / नाही

२९. तुम्ही करता ते काम कसे आहे?

कठीण / स्वास्थ्यासाठी हानिकारक /असुरक्षित किचकट / इतर

३०. कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने सोयी आहेत काय? होय / नाही /

असल्यास कोणत्या अग्निशामक यंत्र / ॲम्बुलन्स / प्रथमोपचारपेटी

३१.कंत्राटदार, मॅनेजर, सुपरवायझर यांचे संबंध तुमच्याशी कशा प्रकारचे आहेत?

चांगले / वाईट

३२.हे काम करीत असताना तुम्हाला स्वास्थ्या संबंधित कोणत्या तक्रारी जाणवल्या?

______________________

३३. तुम्हाला कामाचा ताण जाणवतो काय? ______________________

३४. आपण दररोज किती किलो मिरची खुडणी करता? ______________________

३५.हंगाम संपल्यानंतर आपण काय करता? ______________________

३६.आपण दुसरे काम शोधण्याचा प्रयत्न करता काय? ______________________

३७.हे काम करीत असताना तुमची आर्थिक सथिती सुधारली असे तुम्हाला वाटते काय?-----

३८. काम करताना सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्या वस्तू पुरविल्या जातात?

अप्रन / हातमोजे /मॉस्क

३९. काम करीत असताना येणा-या अडचणी /समस्या

______________________

दिनांक

स्वाक्षरी

__________

Pravarsen Shikshan Sanstha Nagpur

Dr.L.D. Balkhande College of Arts and Commerce Pauni Dist- Bhandara

IQAC

Name of the Department :- Economic's

Date :- 11/04/2023 Time :- 10:00 Am.

Name of the Activity : Survey of Social and Economical condition of

Type of Activity :- Chilly Plant workers.

| Sr. No | Name of the Student | Signature | Topic | Feedback |
|---|---|---|---|---|
| 1 | भावेश डी. पंचभाई | B.D.Panchbhai | | Good |
| 2 | घनश्याम के. कटेखाये | GKatekhaye | | good |
| 3 | गुंजना कावळे | GKawale | | Good |
| 4 | कल्याणी पारधी | KPardhi | | Good |
| 5 | कविता के. खांदाडे | Khandade | | GOOD |
| 6 | निकिता कामडी | NKamdi | | Good |
| 7 | पल्लवी व्ही. शेंडे | P.V.Shende | | good |
| 8 | पंकज व्ही. तिघरे | Tighare | | |
| 9 | पायल एम. मुळसकर | PMulaskar | | good |
| 10 | पायल एम. मोटघरे | P.L.Motghare | | Good |
| 11 | प्रतिक्षा बी. जांभुळे | P.B.Jambhule. | | Good |
| 12 | प्रीया बी. बावनकुळे | Bawankule | | good |
| 13 | रोहिता एल. शहारे | RLShahare | | Good |
| 14 | संजना डी. कावळे | Kawale | | Very Good |
| 15 | श्रध्दा यु. गोवर्धन | SUGowardhan | | very Good |
| 16 | श्वेता आर. मांढरे | SRMandhare | | good |
| 17 | तनुजा आर. धारगावे | Dhargave | | Good |
| 18 | तेजस्विनी एन भाजीपाले | T.N.Bhajipale | | Good |
| 19 | वैष्णवी एन. जुमळे | V.N.Jumale | | good |
| 20 | शिवानी मेश्राम | शिवानी मेश्राम | | good |
| 21 | शोभीता आर. हटवार | Y.R.Hatwar | | Good |
| 22 | पल्लवी एस. बावनकुळे | PSBawankule | | very good |

Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 23 | तृप्ती आर तिघारे | T.R.Tighare | | good |
| 24 | शीतल के. बारसागडे | SKBarsagade | | good |
| 25 | अंकिता ए भाजभिये | A.Bajbhiye | | very good. |
| 26 | आशाफिथा शेख | A Shaikh | | good |
| 27 | अस्मीला एम. नख्याते | ANakhate | | good |
| 28 | करिश्मा के डहाके | KDahake | | good |
| 29 | पल्लवी जी. बावनकर | P.Bawankar | | good |
| 30 | साक्षी एन मंडपे | S.N.Mandpe. | | good. |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

[signature]

Coordinator
Internal Quality Assurance Cell (IQAC,
Dr. L.D. Balkhande College of Arts and
Commerce, Pauni, Dist.- Bhandara

Scanned by CamScanner

# FIELD PROJECT ECONOMICS

## पवनी येथील मिरची खुडणी व्यवसायात काम करणाऱ्या मजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास

सर्वेक्षण करताना विद्यार्थी




















